जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जन सुरक्षा कायदा व १२ तास कामांची तासिका रद्द करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर निदर्शने करून आंदोलन

## सरकारवर भांडवलदार पोसण्याचा व जनसुरक्षा कायदा लोकशाहीविरोधी असल्याचा आरोप



जन सुरक्षा कायदा व १२ तास कामांची तासिका रद्द करण्यासाठी संयुक्त कृती समिती व कामगार शेतकरी कर्मचारी फेडरेशन अहिल्यानगरच्या वतीने मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर निदर्शने करण्यात आली.

नगर - जन सुरक्षा कायदा २०२४ रद्द करावा व १२ तास कामांची तासिका रद्द करण्याच्या मागणीसाठी जनसुरक्षा कायदा रद्द करा संयुक्त कृती समिती व कामगार शेतकरी कर्मचारी फेडरेशन अहिल्यानगरच्या वतीने मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर निदर्शने करण्यात आली. कामगार विरोधी व लोकशाही विरोधी निर्णय घेतले जात असल्याचा आरोप करुन सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनात फेडरेशनचे निमंत्रक व आयटक कामगार संघटनेचे कॉ. सुधीर टोकेकर, हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले, राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे सुभाष तळेकर, किसान सभेचे बन्सी सातपुते, सुभाष कडलग, कॉ. सतीश पवार, महादेव लोणकर, लहू लोणकर, बाबासाहेब लांडगे, अशोक सब्बन, अर्शद शेख, अशोक बाबर, विष्णूपंत म्हस्के, रज्जाक शेख, बाबासहेब करांडे, अमित शिंदे, भरत खाकाळ, राजेंद्र व्यवहारे, सविता दूधाडे, बा.डी. पालवे, गंगाधर त्र्यंबके, अतुल महारनवर, ड. विद्या शिंदे आदींसह विविध जनसंघटना, डावे पक्ष इतर विविध समविचारी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाने दुकाने व आस्थापना त्याचबरोबर कामगारांच्या कामांची तास वाढविण्याचे निर्णय घेतल्याने मंत्रिमंडळात चर्चा होऊन, कामाचे तास वाढविण्याच्या विचारात आहेत.

कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६५ मध्ये कारखान्यातील दैनंदिन कामाची तासाची मर्यादा १२ तासापर्यंत नव्या निर्णयानुसार करण्यात आली आहे. विश्रांतीसाठी पूर्वी ५ तासानंतर अर्धा तास मिळत होता.

तो आता ६ तासानंतर अर्धा तास विश्रांतीसाठी देण्यात येणार आहे. आठवड्याचा कामाचा कार्याचा विस्तार कालावधी साडेदहा तासावरून १२ तास करण्यात आला आहे. तर ओव्हरटाईम (अतिरिक्त काम) मर्यादा ११५ तास प्रति तीमाई होती, ती आता ११४ तासाची तिमाई केली आहे. हे सर्व निर्णय कामगारांच्या आरोग्यावर परिणाम करणारे असून, मोठ्या मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक या शहरांमध्ये कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी दोन तास व येण्यासाठी दोन तास जातात. तीन ते चार तास प्रवास केल्यावर १२ तास काम करायचे. हे ४ तास असे २४ तासांमधील १६ तास कामातच जातील. यामुळे कामगारांचे आरोग्य धोक्यात येणार आहे. याचा विचार करण्यात आलेला नाही. तसेच संघटनांचे विचारही सरकारने घेतलेले नाही. एकतर्फी निर्णय घेऊन कामगार हित जोपासण्याऐवजी अहित केले जात आहे. केवळ मोठे भांडवलदार यांना पोषक वातावरण निर्माण होईल असे निर्णय घेतले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जनसुरक्षा विधेयक हुकूमशाहीप्रमाणे मंजूर करून कामगार संघटनांचे अधिकार काढून घेण्यात आले आहेत. कामगार संघटनांना संप करण्यास परवानगी घ्यावी लागणार आहे. त्यामध्ये बराचसा वेळ जाणार आहे. कोणतीही कामगार संघटना बेकायदेशीर ठरवून त्याची नोंदणी रद्द करता येणार आहे. पदाधिकारीवर खटले दाखल करणे, संघटनेची मालमत्ता जप्त करणे या बाबी जन सुरक्षा कायदा २०२५ मध्ये अंतर्भूत आहे. हा कायदा पूर्णतः कामगार विरोधी असून, नक्षलाच्या नावाखाली दुसरे कायदे यात घुसून कामगार संघटना मोडीत काढण्याचा सरकारचा डाव असल्याचे आंदोलकांनी यावेळी स्पष्ट केले.

जन सुरक्षा कायदा २०२४ रद्द करावा, कामाची शिफारस करुन २४ तासांमध्ये चार पाळ्यांमध्ये काम सुरू करावे, कुठलाही निर्णय घेताना कामगार, नियोक्ता आणि सरकार यांच्या त्रीपक्षीय समितीमध्ये चर्चा व्हावी, सध्याच्या कामगार कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याची मागणी जनसुरक्षा कायदा रद्द करा संयुक्त कृती समिती व कामगार शेतकरी कर्मचारी फेडरेशन अहिल्यानगरच्या वतीने करण्यात आली आहे.



## बेशिस्त वाहन चालकांवर बाजारपेठेत दंडाची मोहीम सुरु

शहरातील डाळ मंडई, आडते बाजार परिसरात बेशिस्तपणे वाहने उभी करून वाहतुकीला अडथळा आणणाऱ्या वाहन चालकांवर शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी दंडात्मक कारवाईची मोहीम ११ सप्टेंबर पासून सुरु केली आहे. या कारवाईमुळे तरी वाहनचालकांना शिस्त लागेल अशी अपेक्षा व्यापारी वर्गातून व्यक्त होत आहे. (छाया धनेश कटारिया)

## नदीवरील बंधाऱ्याच्या लोखंडी प्लेटांची चोरी

नगर - नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यावर लावण्यात आलेल्या लोखंडी प्लेटा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील वाळकी शिवारात बोठे वस्ती परिसरात ८ सप्टेंबर रोजी दुपारी ४.३० ते ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० च्या दरम्यान घडली.

याबाबत पाटबंधारे विभागाच्या कालवा निरीक्षक वैशाली प्रमोद पवार यांनी १० सप्टेंबर रोजी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. वाळकी शिवारात बोठे वस्ती परिसरात वालुंबा नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा असून त्यावर बसविलेल्या ४४ हजार रुपये किंमतीच्या लोखंडी प्लेट अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

# फ्लेक्स मुक्त अहिल्यानगर अभियानांतर्गत अनधिकृत फलकांवर कारवाई सुरू; विनापरवाना फ्लेक्स लावणाऱ्यांवर महानगरपालिका 'गुन्हे' दाखल करणार

## अनधिकृत फलकांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई होणार : आयुक्त यशवंत डांगे


फ्लेक्स मुक्त अहिल्यानगर अभियानांतर्गत अनधिकृत फलकांवर कारवाईला महापालिकेतर्फे सुरुवात करण्यात आली.

नगर - शहरात आस्थापनांच्या जाहिरातींसाठी, तसेच सण उत्सवाच्या शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात फलक लावले जात आहेत. महानगरपालिकेने याची गंभीर दखल घेतली असून शहरात अनधिकृतपणे महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता लावलेल्या फलकांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. महानगरपालिकेने फ्लेक्स मुक्त अहिल्यानगर अभियान हाती घेतले असून, यापुढे फलक लावणाऱ्या आस्थापना, व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.

शहरात फ्लेक्स, फलक लावण्यापूर्वी महानगरपालिकेची रीतसर परवानगी घ्यावी, असे आवाहन यापूर्वी वेळोवेळी महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे. अनधिकृत फ्लेक्स, पोस्टर, फलक लावणाऱ्यांवर महानगरपालिकेकडून यापूर्वी गुन्हेही दाखल करण्यात आले होते. आता महानगरपालिकेने पुन्हा कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. महानगरपालिकेच्या पथकाने शहरातील विविध भागातील अनधिकृत फ्लेक्स बुधवारी हटवले आहेत.

शहरात विनापरवाना फ्लेक्स लावू नये, रीतसर परवानगी घेऊन बोर्ड लावावेत, असे आवाहन महानगरपालिकेने अनेकवेळा केलेले आहे. तरीही विनापरवाना फ्लेक्स लावले जात असल्याने गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत. आता फौजदारी व दंडात्मक अशा दोन्ही स्वरूपाच्या कारवाया करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

## बांधकाम व्यावसायिकाला शिवीगाळ करत धमकावले

नगर - नगर शहरातील विनायकनगर परिसरात राहणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाच्या घराच्या आवारात घुसून तिघांनी त्यास शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना १० सप्टेंबर रोजी सकाळी ९.५४ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत आशिष नामदेव लोखंडे (वय ४५, रा. सार्थक, भवानीनगर, मार्केट यार्ड मागे) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांना त्यांच्या बंगल्या शेजारी राहणाऱ्या ढेल्या कदम्या चव्हाण, सिंधू पोपट चव्हाण आणि ढेल्या याचा चुलता अशा तिघांनी शिवीगाळ करत तलवारीने जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी तिघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# फळ विक्रीत फसवणूक झाल्याने शेतकऱ्याची आत्महत्या

## व्यापाऱ्यावर जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनी झाला गुन्हा दाखल

नगर - डाळींब बागेतील फळ विक्री व्यवहारात सुमारे ७ लाखांची आर्थिक फसवणूक झाल्याने आलेल्या नैराश्यातून तरुण शेतकऱ्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील तांदळी वडगाव येथे घडली होती. या प्रकरणी फळांचा व्यापारी नितीन बबन शिंदे (रा.देशमुखवाडी, ता.कर्जत) याच्या विरुद्ध जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनी १० सप्टेंबर रोजी रात्री नगर तालुका पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत मयत किरण पोपट ठोंबरे (वय ३२) याचे वडील पोपट दशरथ ठोंबरे (वय ६७, रा. तांदळी वडगाव, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचा मयत मुलगा यांचा शेती व्यवसाय असून त्यांनी त्यांच्या शेतात डाळींब या फळझाडांची लागवड केलेली आहे. सन २०२३ रोजी या बागेतील डाळींब फळे आरोपी नितीन शिंदे यांना विकली होती. संपूर्ण बागेचा व्यवहार हा १० लाख ५० हजार रुपयांना ठरला होता.

त्यातील ३ लाख ४९ हजार एवढीच रक्कम आरोपी याने फिर्यादीच्या पत्नीच्या बँक खात्यावर पाठविली. उर्वरित रक्कम देण्यास टाळाटाळ केली. याबाबत मयत किरण याने आरोपीला वारंवार संपर्क करून पैसे देण्याची विनंती केली. मात्र पैसे न देता आरोपीने किरण यास शिवीगाळ, दमदाटी करत त्रास द्यायला सुरुवात केली. अखेर त्याच्या त्रासाला कंटाळून आणि आर्थिक फसवणूक झाल्याने आलेल्या नैराश्यातून किरण याने २१ मे २०२४ रोजी शेतातील झाडाला गळफास घेत आत्महत्या केली. त्यानंतर फिर्यादी यांनीही आरोपीला अनेकदा पैशांची मागणी केली मात्र त्याने टाळाटाळ केली. आपला मुलगा किरण याच्या आत्महत्येस आरोपी नितीन शिंदे हाच जबाबदार असल्याची फिर्याद पोपट ठोंबरे यांनी दिल्यानंतर पोलिसांनी आरोपी शिंदे याच्या विरुद्ध बीएनएस कलम १०८ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# हॉटेल चालकास रात्रीच्या वेळी रस्त्यात अडवून कोयत्याने मारहाण करत कारची केली तोडफोड

नगर - रात्री हॉटेल बंद करून मित्राची कार देण्यासाठी चाललेल्या हॉटेल चालकाला महामार्गावर अडवून त्यास कोयत्याने मारहाण करत कारच्या काचा फोडून नुकसान केल्याची तसेच कारमधील १५ हजार रुपये बळजबरीने घेवून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना नगर - कल्याण महामार्गावर नेप्ती शिवारात असलेल्या छत्रपती अभियांत्रिकी कॉलेजच्या गेटसमोर ९ सप्टेंबरला मध्यरात्री १२.३० च्या सुमारास घडली.

सचिन बाळासाहेब जपकर (वय ३२, रा. रानमळा, नेप्ती, ता.नगर) असे जखमी हॉटेल चालकाचे नाव असून त्यांच्या फिर्यादी वरून राहुल ठाणगे (रा.हिवरे बाजार) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन जपकर हे नगर कल्याण रोडवर असलेले त्यांचे साई हॉटेल बंद करून त्यांचा मित्र बापू मच्छिंद्र पुंड (रा. निमगाव फाटा, ता.नगर) यांच्या कडे त्यांची हुंदाई कंपनीची कार (क्र.एम एच १७ बी वाय ५६५९) ही देण्यासाठी चालले होते. छत्रपती अभियांत्रिकी कॉलेजच्या गेट समोर आरोपी राहुल ठाणगे याने दारूच्या नशेत त्याची मारुती स्विफ्ट कार त्यांच्या कार समोर आडवी लावली. कार मधून कोयता काढत तू लय माजला का ? कॉलेजला असताना लय दादागिरी करत होता. असे म्हणून शिवीगाळ करत फिर्यादीच्या हातावर कोयत्याने वार केला. तसेच फिर्यादीकडे असलेल्या कारच्या काचा फोडत नुकसान केले व कार मधील १५ हजार रुपये बळजबरीने काढून घेतले. तसेच फिर्यादीला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फिर्यादीवरून राहुल ठाणगे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास पोहेकॉ. सोमनाथ जायभाय करत आहेत.


## विनोद संभार यांचे अल्प आजाराने निधन



नगर - तोफखाना येथील जंगुभाई तालीम शेजारील रहिवासी विनोद भुमय्या संभार (वय ६५) यांचे ११ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ भाऊ, भावजय, पत्नी, १ मुलगा, सुन, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. राजेंद्र संभार यांचे ते मोठे बंधू होत.

## सिद्राम साठे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - केडगाव पिंक सिटी जवळील रहिवासी सिद्राम (आप्पा) पाराजी साठे (वय ८३) यांचे १० सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर लालटाकी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, पुतण्या, १ भाऊ, जावई, सुना असा परिवार आहे. भाऊसाहेब साठे यांचे ते वडील होत.

## सुरेश (दादा) कुलकर्णी यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील महाराष्ट्र बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी सुरेश (दादा) दिगंबर कुलकर्णी (वय ७६) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुभाष कुलकर्णी यांचे थोरले बंधू, गौरव कुलकर्णी यांचे चुलते होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.


सारस्वतांच्या संमेलनास ग्रंथदिंडीने प्रारंभ करण्यात आला.

# सारस्वतांच्या संमेलनास ग्रंथदिंडीने प्रारंभ

## मराठीचे गुणगान करीत ग्रंथ दिंडी उत्साहात

नगर - नगरमध्ये होत असलेल्या राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाच्या उद्घाटन पूर्वी निघालेल्या ग्रंथ दिंडीत सारस्वत मंडळी पारंपारिक वेशभुषेत भगवे फेटे बांधून सहभागी झाले होते. मराठीच्या जयजयकारात झालेला प्रेरक सोहळा सकाळी नगरकरांनी अनुभवला. जवळपास एक किलोमीटर लांब असलेली ही ग्रंथदिंडी सकाळी ९ वाजता छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या स्मारकापासून निघाली. दिंडीत अग्रभागी न्यु आर्ट्स महाविद्यालयाचे ढोल व लेझीम पथक, पारंपारिक मराठमोळ्या वेशभूषेत सहभागी झालेले विद्यार्थी अशा विविधतेने निटलेली ग्रंथादिंडी दिमखात निघून लक्षवेधी ठरली. यामध्ये अनेक साहित्यिक, कवींसह साहित्य प्रेमींची उपस्थिती होती.


ग्रंथ दिंडीचा शुभारंभ साहित्य संमेलनाचे स्वागत अध्यक्ष अर्थतज्ञ डॉ. प्रशांत भालेराव यांच्या हस्ते झाले. यावेळी संमेलनाच्या अध्यक्षा अभिनेत्री गौरी देशपांडे, अखिल भारतीय मराठी नाट्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, डॉ. अभिजीत पाठक, नाट्य परिषदेचे प्रसाद बेडेकर व अमोल खोले, संमेलनाचे निमंत्रक जयंत येलुलकर, न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब सागडे, उपप्राचार्य अनिल आठरे यांच्यासह प्राध्यापक व साहित्यिक, कवी उपस्थित होते. छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या समाधीस व पुतळ्यास सर्व पाहुण्यांनी अभिवादन करून या ग्रंथदिंडीस सुरुवात झाली.

ग्रंथदिंडीतील सजवलेल्या पालखीमध्ये सार्थ ज्ञानेश्वरी, भारताचे संविधान आणि शाहू महाराजांच्या आठवणी हे ग्रंथ ठेवण्यात आली होती. वाजतगाजत ही ग्रंथदिंडी संमेलन स्थळी आल्यावर प्रवेशद्वारेचे उद्घाटन स्वागत अध्यक्ष प्रशांत भालेराव यांच्या हस्ते झाले. ग्रंथ प्रदर्शनाचे स्व.दादा चौधरी प्रवेशद्वाराचेही उद्घाटन झाले.

तसेच संमेलनाचे ध्वजारोहण ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सचिव ॲड.विश्वासराव आठरे, सहसचिव मुकेश मुळे, डॉ. सुधा कांकरिया यांच्यासह सर्वांच्या हस्ते झाले.

# नगर, टाकळी काजी, भातोडी, बीड रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम

## चौकशी करून कारवाई करा, कार्यकारी अभियंत्यांना खासदार निलेश लंके यांचे पत्र


नगर, टाकळी काजी, भातोडी, बीड रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे कामाबाबत चौकशी करून कारवाई करण्याबाबतच्या मागणीचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव यांना निवेदन देताना राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष शौकत तांबोळी, सरपंच शरद पवार आदी.

नगर - अहिल्यानगर-टाकळी काझी-भातोडी-बीड या महामार्ग क्र. १६ (कि.मी. २०/४० ते २५/३४०) रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम गेल्या १८ महिन्यांपासून रखडले असून ३६ महिन्यांत पूर्ण होणारे काम अद्याप मार्गी लागलेले नाही. या कामामुळे परिसरातील पंचक्रोशीतील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने खासदार निलेश लंके यांच्या पत्रावरून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव यांना निवेदन देताना राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष शौकत तांबोळी, चिचोंडी पाटीलचे सरपंच शरद पवार, काँग्रेस तालुका अध्यक्ष अरुण म्हस्के, अल्पसंख्यांक अध्यक्ष पापामिया पटेल, केशव बेरड, गणेश तोडमल, चंदूकाका पवार आदी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, विलंबामुळे रस्त्याची दुर्दशा झाली असून मोठमोठे खड्डे, अर्धवट डांबरीकरण व निकृष्ट दर्जाचे काम यामुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. दररोज अपघात व वाहतुकीला अडथळे वाढत असून नागरिकांत तीव्र संताप व्यक्त केला जात असुन कामाचे स्वतंत्र गुणवत्ता नियंत्रण समितीमार्फत परीक्षण करावे, ठेकेदाराने केलेल्या निकृष्ट कामावर कारवाई करून आवश्यक त्या दंडात्मक उपाययोजना कराव्यात, प्रलंबित काम निश्चित वेळेत पूर्ण करावे व त्याबाबत दर १५ दिवसांनी अहवाल सादर करावा, सार्वजनिक बांधकाम विभागाने स्वतःहून देखरेख ठेवून तातडीने काम मार्गी लावून निकृष्ट व विलंबित कामाबाबत ठेकेदार जबाबदार असून त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड केली जाणार नाही, असा इशाराही निवेदनात दिला आहे.

सेल्फ ॲडेसिव्ह पी व्हि सी वॉल टाईल्स, सेल्फ ॲडेसिव्ह वॉलपेपर,किचन वॉलपेपर, रोमन ब्लॉईंडस्, रोलर ब्लॉईंडस्, झेब्रा ब्लॉईंडस्, व्हर्टिकल ब्लॉईंडस, उडन ब्लॉईंडस्, कस्टमाईज ब्लॉईंडस्, चीक् ब्लॉईंडस्, तयार कर्टन्स, कर्टन क्लॉथ, कर्टन रॉड व फिटींग, मच्छर जाळी, आर्टिफिशियल ग्रास, धुळी पासुन संरक्षणासाठी प्लास्टीक तयार पडदे
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# गृहिणी

## आरोग्य

३-६ ग्रॅम शंखपुष्पी पूड साखर आणि दुधाबरोबर नेहमी सकाळी घेतल्याने स्मरणशक्ती वाढते. शंखपुष्पी २-४ ग्रॅम मुलांना दिल्याने मुलं खूपच बुद्धिमान आणि शहाणे होतात. सकाळी शंखपुष्पीचे थोडे पाणी घालून रस काढता येतो. शुद्ध रस १०-२० मिलीग्रॅम किंवा २-४ ग्रॅम पूड मध, तूप आणि साखरेबरोबर सहा महिन्यांपर्यंत सेवन करीत राहिल्याने स्मरणशक्ती आणि बुद्धीत वाढ होते. दूध, तूप किंवा पाण्यासोबत मिलीग्रॅमच्या प्रम णात दिवसातून दोन-तीन वेळा एक वर्षापर्यंत किंवा किमान एक महिन्यापर्यंत घेतल्याने स्मरणशक्तीत वाढ होते. २५० ग्रॅम खडीसाखरेसोबत पाक करून रोज १० ग्रॅम सकाळ-संध्याकाळ खाण्याने विसरण्याची सवय दूर होते.

जवस : रोज जेवण झाल्यावर बडीशेपऐवजी जवस खा. जवस खाल्ल्याने शरीरात नवऊर्जा निर्माण होते आणि गुडघेदुखीचा त्रासही काही प्रमाणात कमी होतो.

पांढरे तीळ :

पांढरे तीळ खाल्ल्याने हाडे मजबूत होतात. त्यामुळे आपल्याला कंबरदुखी, गुडघेदुखीचा त्रास कमी होतो.

बध्दकोष्ठतेच्या त्रासावरही मटार फायदेशीर आहे, कारण मटारमध्ये फायबरची मात्रा अधिक असते. मटारमध्ये प्रथिन्यांबरोबरच 'क' जीवनसत्त्वही मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे हाडांच्या मजबुतीसाठी मटार उपयुक्त ठरतो.

## पाककला

### चेरी ज्युबिली

**साहित्य** - क्रीम दूध ५०० मि.ली., कस्टर्ड पावडर १ टेबलस्पून, साखर पाऊण कप, व्हेनिला इसेन्स २ टी स्पून, क्रीम ५०० मि.ली., बिया काढलेली चेरी २ कप, अर्धा कप साखर.

**कृति** - अर्धा कप दुधात कस्टर्ड व साखर मिसळा. उरलेले दूध गरम करा. जेव्हा ते उकळू लागेल तेव्हा त्यात साखर मिसळा व सतत ढवळत पुन्हा एक उकळी द्या. यानंतर जाळ मंद करून अर्धा मिनिट शिजवा. नंतर जाळ बंद करून थंड होण्यासाठी ठेवा. आता दोन कप चेरीत अर्धा कप साखर मिसळा व थोडेसे शिजवून घ्या. जेव्हा मिश्रण थंड होईल तेव्हा त्यात क्रीम, व्हॅनिला इसेन्स व चेरी मिसळून घट्ट झाकणाच्या कंटेनरमध्ये ठेवा व फ्रिजरमध्ये गोठण्यासाठी ठेवा. जेव्हा मिश्रण गोठेल तेव्हा फ्रिजमधून काढून ब्लेंडरमध्ये व्यवस्थित घुसळून घ्या. नंतर पुन्हा कंटेनरमध्ये भरून फ्रिजरमध्ये ठेवा. जेव्हा मिश्रण गोठेल तेव्हा चेरी व फ्रूटस्ने सजून सर्व्ह करा.

## सौंदर्य

* दूध, साय व मध एकत्र करून रात्री झोपताना त्याचा लेप चेहऱ्यावर लावावा. दुसऱ्या दिवशी सकाळी कोमट पाण्याने चेहरा धुतला की, त्वचा नरम पडते. आर्द्रता वाढते. रखरखीतपणा नाहीसा होतो. यामुळे मुरुम-पुटकुळ्याही नष्ट होतात.

* मानेचा मागचा भाग हा काळा पडतो. तो काळेपणा घालविण्यासाठी स्नान करताना आंबट दही चोळावे. काही दिवसातच काळेपणा कमी होईल.

## वास्तू

मुख्य दरवाजानुसार विजेचा किंवा सिमेंटचा खांब असणेही अशुभ आहे. मुख्य दरवाजासमोर तुळस लावावी. मुख्य दरवाजासमोर स्वस्तिकची रांगोळी काढावी.

## सल्ला

भेंडी चिरताना सुरीवर लिंबाचा रस लावा यामुळे भेंडीचे तार सुटत नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर २०२५

**षष्ठी श्राद्ध, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, भरणी ११।५९, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : तुमची ऊर्जा पुन्हा मिळविण्यासाठी संपूर्ण विश्रांती घ्या कारण अशक्तपणामुळे तुमचे मन कमकुवत होते.

**वृषभ** : तुमची खरी क्षमता ओळखा. अन्यथा तुम्ही शक्ती नाही तर इच्छा गमावून बसाल. मालमत्ताविषयक कामे होतील आणि उत्तमपैकी नफा होईल.

**मिथुन** : आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. आज तुम्हाला चांगल्यापैकी पैसा मिळणार आहे

**कर्क** : तुमच्या हातातून पैसे हरवू देऊ नका. आजच्या दिवशी आपल्या कुंटुंबातील सदस्यांच्या गरजांवर लक्ष केंद्रीत करणे ही तुमची प्राथमिकता असेल.

**सिंह** : आपल्या आत्मविश्वासाला अपेक्षांची जोड मिळाल्यामुळे आपली स्वप्ने प्रत्यक्षात येतील.

**कन्या** : आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला महत्त्वाच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील.

**तूळ** : एका कठीण काळानंतर आजच्या दिवशी तुम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का बसेल. तुम्ही बालपणीच्या आठवणींमध्ये रमाल.

**वृश्चिक** : सदोदित तुमच्यातील लहान मूल कार्यरत ठेवण्याची तुमची क्षमता गमावून बसलात हे तुमच्या चिंतेचे मुख्य कारण ठरेल.

**धनु** : आशावादी रहा आणि चांगल्या उजळ बाजूकडे लक्ष द्या. या प्रक्रियेत तुम्ही विनाकारण मानसिक त्रास करून घ्याल.


**मकर** : आज तुमच्याजवळील उत्तम संकल्पना आणि तुम्ही केलेल्या कृती यामुळे तुम्हाला अपनेक्षीत फायदा होईल.

**कुंभ** : आज तुम्हाला जाणीव होईल, की लग्नाच्या वेळी जी वचनं दिली होती, ती सगळी खरी होती, तुमचा/तुमची जोडीदार ही खरंच सोलमेट आहे.

**मीन** : स्वप्नील चिंता सोडून द्या आणि आपल्या रोमॅण्टीक जोडीदाराच्या सहवासाचा आनंद घ्या. आनंद, समाधान आणि व्यवसाय दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या ठेवा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. १२०५ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द** :- १) संजीवकुमार, जया भादुरी यांचा एक चित्रपट ६) मेरे ++ की गंगा और तेरे मन की जमना का (गाणे) ७) हमे तुमचे प्यार कितना ये हम नही जानते +++ + ++ सकते तुम्हारे बिना १०) या देवर्षीची भूमीका करण्यात दिवंगत अभिनेता जीवन याचा हातखंडा होता ११) ++ + पुकार (चित्रपटाचे नाव) १४) धर्मेंद्र, वहिदा रहेमान, ललिता पवार यांचा एक चित्रपट १६) अनहोनी को ++ कर दे होनी को अनहोनी (गाणे) १८) ++ जमाना (चित्रपटाचे नाव) २०) ++ स्टोरी (चित्रपटाचे नाव) २१) ++ तेरा देवर दीवाना (गाणे)

**उभे शब्द** :- + ++ +++ + न हम बेवफा (गाणे) २) +++ ए यार (चित्रपटाचे नाव) ३) बावरे +++ (चित्रपटाचे नाव) ४) ++ बलराम (चित्रपटाचे नाव) ५) गोविंदा, खुशबू यांचा एक चित्रपट ८) ++ की राह (चित्रपटाचे नाव) ९) ऋषी कपूर, झेबा बख्तियार, अश्विनी भावे यांचा एक चित्रपट १२) एक अभिनेत्री १३) धर्मेंद्र, चंकी पांडे, श्रीदेवी, सोनम यांचा एक चित्रपट १५) रात का समा झूमे चंद्रमा ++ मोरा नाचे रे जैसे (गाणे) १७) ++ मुकेश (एक अभिनेता) १९) ++ आ रही है तेरी याद आ रही है (गाणे)

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : हिंमत ही अंतःकरणातून निर्माण होणारी वस्तू आहे.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## प्लीहा म्हणजे काय?

प्लीहा हे इंद्रिय आपल्या शरीरात डाव्या बाजूला असते. छातीच्या पिंजऱ्यामध्ये छाती व पोट यांमध्ये असलेल्या डायफ्रॅम या स्नायूच्या खाली प्लीहा असते. श्वसनाबरोबर प्लीहा वरखाली होत असते. शरीरातील रोगप्रतिबंधक शक्तीसाठी एखाद्या लसिकाग्रंथीप्रमाणे प्लीहा कार्य करते. शरीरात कोणताही 'परकीय' पदार्थ शिरला की, प्लीहेमध्ये टी व बी प्रकारच्या लिम्फोसाईट्स (पांढऱ्या रक्तपेशींचा एक प्रकार) तयार होण्याचे प्रमाण वाढते. या पेशी रोगप्रतिकारशक्तीसाठी कारणीभूत असतात. 'बी' प्रकारच्या लिम्फोसाईट्स परकीय पदार्थ वा अँटीजेनच्या विरुद्ध प्रतिद्रव्ये (अँटीबॉडीज) तयार करतात, तर 'टी' प्रकारच्या पेशी अँटीजेन बाबत 'स्मरणशक्ती' निर्माण करतात. प्लीहेचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे दुखापत झालेल्या, निरुपयोगी झालेल्या रक्तपेशींचा नाश करणे. याचबरोबर लाल रक्तपेशीतील हिवतापाच्या जंतूंना मारण्याचे कामही प्लीहेतील पेशी करतात. त्यामुळेच हिवतापात प्लीहेचा आकार वाढलेला असतो. प्लीहा रक्तातील एकूण रक्तबिंबीकांपैकी (प्लेटलेट) ३० ते ४० टक्के रक्तबिंबीका गाळून साठवून ठेवते.

गर्भावस्थेत ५ व्या महिन्यापासून मूल जन्माला येईपर्यंत प्लीहेमध्ये रक्तनिर्मितीचे कार्य होत असते. मूल जन्माला आल्यानंतर मात्र हे कार्य थांबते.

कधीकधी काही रोगांमुळे प्लीहा लाल रक्तपेशींचा खूपच जास्त प्रमाणात नाश करू लागते. त्यामुळे प्लीहेचा आकार वाढतोच, पण त्याबरोबरच ॲनेमिया या रक्तपांढरीही होते. अशावेळी किंवा प्लीहेमध्ये कर्करोग झाल्यास प्लीहा शस्त्रक्रिया करून काढून टाकावी लागते.

## गाढव आणि लांडगा

एका रानात खूप प्राणी राहत होते. त्यांत एक चांगले धष्टपुष्ट गाढव आणि एक लांडगाही राहत होता. एकदा लांडग्याने त्या धष्टपुष्ट गाढवाला चरताना पाहिले. याचे थोडे जरी मास खायला मिळाले, तर काय मजा येईल, असा विचार लांडग्याच्या मनात येताच त्याच्या तोंडाला पाणी सुटले. या गाढवाला कसे फसवावे, याचा विचार त्याच्या मनात आला आणि त्याने एक बेत रचला.

लांडग्याने वैद्याचे सोंग घेतले आणि सर्व प्राण्यांना कळविले की, ''मी अनेक देशांत हिंडून-फिरून सर्व औषधांची माहिती घेतली आहे. माझ्याकडे सर्व रोगांवर रामबाण औषधी वनस्पती आहेत. प्राण्यांचे सर्व रोग मी बरे करू शकतो.''

लांडग्याचा आपल्यावर डोळा आहे, फसवून माझे मांस त्याला खायचे आहे; म्हणूनच त्याने हे ढोंग रचले आहे, हे गाढवाने ओळखले आणि त्या लांडग्याला चांगली अद्दल घडवावी, असा विचार गाढवाच्या मनात आला.

मग भोळेपणाचा आव आणून गाढव खोटेच लंगडत-लंगडत लांडग्यापुढे गेले आणि म्हणाले,

''वैद्य महाराज, माझ्या पायात काटा घुसल्याने मी अगदी वैतागून गेलो आहे. कृपा करून त्यावर काही उपाय करा.''

यावर लांडगा साळसूदपणा दाखवित म्हणाला,

''अरे मित्रा, असा माझ्याजवळ ये; म्हणजे मला तुझा पाय चांगला पाहता येईल.'' लांडगा असे म्हणताच गाढव त्याच्याजवळ गेले आणि आपल्या मागच्या पायाची अशी सणसणीत लाथ लांडग्याच्या तोंडावर हाणली की, ह्या तडाख्याने त्याचे तोंड फुटून तो मोठमोठ्याने आकांत करू लागला. असे पाहताच गाढवाने धूम ठोकून तेथून पलायन केले; आणि जाता-जाता म्हणाले,

''मला फसवतोस काय लबाडा! आता बस कोकलत.''

**तात्पर्य** : आपल्यापेक्षा सवाई कोणी तरी भेटतोच.

# जीवन का अमृत (भाग १)



उसके हुक्म से हर एक पत्ता हिलता है, उसके हुक्म से ही हमारी जिंदगी में उतार चढ़ाव आते हैं। तो वह अवस्था, जिसके बारे में गुरुवाणी में आया है, 'तेरा भाणा मीठा लागे,' उस अवस्था की यहाँ बात कर रहे हैं कि हमें एक ऐसी जिंदगी जीनी है, जिसे हम प्रभु की मर्जी से जीयें। हम यह न सोचें कि हम गुणों से भरपूर हैं, हम यह जान लें कि हम इंसान तो ग़लतियाँ करते ही रहेंगे और हर समय प्रभु से उसकी दया-मेहर, उसकी कृपा माँगते रहेंगे। आगे बाबा फरीद जी फ़रमा रहे हैं :

**तै साहिब की मै सार न जानी ।**
**र जोबनु खोइ पाछै पछुतानी ॥**

यहाँ वे कह रहे हैं कि हे परमात्मा! मैंने आपकी कद्र नहीं जानी, आपको मैंने पहचाना नहीं।

### गुरू और परमात्मा

जो मेरी जवानी का समय था, वह मैंने गँवा दिया। मैंने अपना ध्यान आपकी ओर नहीं किया और अब मैं पछता रही हूँ।

हम अपनी जिंदगी को देखें, जब हम बच्चे होते हैं तो यहाँ के तौर-तरीके सीखने में, रीति-रिवाज़ सीखने में, पढ़ाई-लिखाई करने में समय निकल जाता है। जब बड़े होते हैं, तो किसी कार्य में लग जाते हैं, चाहे नौकरी करें, चाहे व्यापार करें और जब हमारी शादी हो जाती है, बाल-बच्चे हो जाते हैं तो उनके पालन-पोषण में लग जाते हैं और कोशिश यही करते हैं कि बच्चों को अच्छे तरीके go settle (आबाद) कर सकें और तब तक हम बुढ़ापे की अवस्था में पहुँच जाते हैं। यहाँ पर बाबा फ़रीद जी हमें समझा रहे हैं कि अगर हमने अपनी जवानी का समय सिर्फ घर गृहस्थी में या जीने के साधन इकट्ठे करने में गँवा दिया, तब फिर जो समय है इस दुनिया में हमारा रहने का, वह बहुत कम रह जाता है। वैसे भी जब बुढ़ापे में इंसान पहुँचता है, शरीर धीरे-धीरे काम करना बंद कर देता है।

शरीर को नाना प्रकार की बीमारियाँ घेर लेती हैं, कभी एक बीमारी, कभी दूसरी और कभी तीसरी। तो जो सबसे अच्छा समय है, हमारी जिंदगी का, जिसे जवानी का समय कहा जाता है, उसे हम गँवाएँ नहीं। इसलिए संत दर्शनसिंह जी महाराज बहुत बार कहा करते थे, 'Catch them while they are young,' जब बच्चे छोटे हों, तभी जितनी जल्दी हो सके, उन्हें पकड़ लो और प्रभु की ओर लगा दो। जितनी जल्दी हम प्रभु की ओर लगेंगे, उतना ज़्यादा समय हमारे पास होगा, ताकि हम अपने आप को सही रुप में जान सकें ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

**२. तांबेरा (जंक चढ़ना) :-**

(धान, सोयाबीन, गेहूं जैसी फसल पर आने वाली बीमारी) : कडुवे नीम का तेल १०० मि.ली., करंजी का तेल १०० मि.ली., गोमूत्र १०० मि.ली, स्टीकर १० मि.ली., (एब्सा ८०, ॲमवे, २० ग्रॅम साबुन पाउडर), १५ ली. पानी मिलाकर छिड़काएँ। अथवा इ) (करपा नियंत्रण का 'इ' फॉर्मुला प्रयोग कर सकते हैं।) मन

**३. भूरी और डाऊनी मिल्ड्यू के नियंत्रण के लिये :** देशी पपीते के पत्ते २ किलो, सहजन के पत्ते २ किलो, ४ ली. गोमूत्र, २०० ली. पानी में मिलाकर ३ दिन तक टंकी में सड़ने दें। इस मिश्रण को रोज दो बार डंडे से घड़ी की दिशा में हिलाएं और छानकर फंवारें। (टंकी के मुख को मोटे कपड़े से बांधकर रखें) वली अथवा

### आज्ञा चक्र

इ) (करपा नियंत्रण का 'इ' फॉर्मुला प्रयोग कर सकते हैं।)

**७) सफेद लट (हुमनी) अथवा दीमक (उदई) के लिए :)** एक किलो बच (वेखंड) कूटकर पाउडर बनाएं। इसे ६ ली. पानी में डालकर, उस पानी को ३ ली. होने तक उबालें। यह मिश्रण ठण्डा होने के बाद ५०० ग्राम हींग, २०० ली. पानी में मिलाकर एक एकड़ खेती में जमीन गीली हो तब छिड़काएँ या पानी के साथ छोड़ दें। अथवा

इ) एक किलो रूई की पौधों की गीली लकड़ी के छोटे छोटे टुकड़े करके ६ ली. पानी में डालकर यह पानी ३ ली. होने तक उबालें। यह मिश्रण ठण्डा होने के बाद २०० ली. पानी के साथ जमीन गीली हो तब छिड़काएँ या पानी के साथ छोड़ दें। अथवा

उ) एक किलो मेटॅरीजियम एनीसोपलीई १.०% घुलनशील चूर्ण एक एकड़ जमीन में ५० किलो मिट्टी में या गोबर में मिलाकर जमीन गीली हो तब शाम के समय छिड़काएँ या पानी के साथ छोड़ दें। अथवा १०० लीटर पानी में मिलाकर शाम के समय जमीन गीली हो तब छिड़कायें।

**८) फल की साइज बढ़ाने के लिए :**

२०० ग्राम जेष्ठ मध (पाउडर बनाके), २०० ग्राम तिल कूटकर ५ ली. पानी में मिलाकर पानी अढ़ाई ली. होने तक उबालें। मिश्रण ठण्डा होने के बाद ५०० ग्राम गुड़ मिलाएं और २०० ली. पानी में मिलाकर छिड़काएँ।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको - 'रईस' चित्रपट बघायला जाऊयात का?
नवरा - मी तेवढा 'काबिल' नाही.
बायको - मग 'काबिल' बघायला जाऊयात.
नवरा - मी तेवढा 'रईस' नाही.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'द मेकिंग ऑफ नथुराम गोडसे ॲण्ड हीज आयडीया ऑफ इंडिया' या पुस्तकाचे लेखक कोण? - धिरेंद्र झा

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

परंतु योनीमध्ये पडदा असेल, योनीच्या भिंती एकमेकांना चिकटल्या असतील किंवा गर्भाशयमुख बंद असेल तर मात्र त्या अवस्थेनुसार अडथळा दूर करून मार्ग खुला करावा लागतो. योग्य वय होऊनही मुलीला पाळी येत नसेल तर लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. कारण बरेच दिवस पाळीचा रक्तस्राव गर्भाशयात साचून राहिल्यामुळे मुलीच्या जननेंद्रियाचे नुकसान होऊ शकते. याकरिता बालिकेचा जन्म झाल्यानंतरच जननेंद्रिय व्यवस्थित आहे ना, याची तपासणी करून घ्यावी.

**२) बीजकोषाची वाढ नसणे :** बीजकोषाची वाढ नसेल किंवा ते अतिशय शुष्क असेल तर पाळी येत नाही. अशा परिस्थितीतील किशोरावस्थेतील मुली उंचीने कमी असतात. त्यांच्या स्तनांची वाढ होत नाही. एकूणच शारीरिक बांधा प्राकृत मुलीपेक्षा वेगळा दिसतो. याचे कारण म्हणजे बीजकोषांमध्ये इस्ट्रोजन हार्मोन्स तयार होत नाहीत. अशा वेळी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**३) पियुषिका (पिट्युटरी) ग्रंथीची वाढ नसणे** : पियुषिका ग्रंथीच्या चालनेवर इस्ट्रोजन व प्रोजेस्टेरॉन हे स्राव बीजकोषांमध्ये तयार होत असतात. परंतु जर पियुषिका ग्रंथीचीच वाढ व्यवस्थित नसेल तर मासिक पाळी सुरू होत नाही. या अवस्थेमध्ये मुलीची उंची कमी असते, स्तनांची वाढ होत नाही. एकूणच स्त्री शरीराची ठेवण प्राकृत नसते. अशा वेळी तज्ज्ञ डॉक्टरांकडून मुलीची तपासणी करून घ्यावी.

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

**२) दुय्यम अनार्तव** (Secondary menorrhoea) - या अवस्थेमध्ये मासिक पाळी प्रथमत: व्यवस्थित सुरु होते. मात्र काही कारणास्तव अनियमित किंवा बंद होते. ही अवस्था येण्याची कारणे : १) शारीरिक विकार २) अंत:स्रावी ग्रंथींचे विकार ३) मानसिक ताणतणाव ४) औषधाचा दुष्परिणाम

**१) शारीरिक विकार :** काही स्त्रियांना जननेंद्रियाचा क्षयरोग होतो. अशा वेळी गर्भाशयाच्या आतील अस्तराची जाडी कमी-कमी होत जाते. पाळीमधील रक्तस्रावाचे प्रमाण कमी होऊन ती कायमचीच बंद होते. अशा अवस्थेत तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने क्षयरोगावर उपचार करावेत. गर्भाशय लेखन (क्युरेटीन) जर अति प्रमाणात झाले तर गर्भाशयाच्या आतील अस्तर हे जास्त प्रमाणात खरवडले जाते. त्यामुळे त्याच्या आतील स्नायूंना इजा पोहोचते. त्यामुळे गर्भाशयाचे दोन्ही पृष्ठभाग हे एकमेकांना चिकटतात. त्यामुळे अस्तराचा नाश होतो व पाळी येत नाही. काही गंभीर स्त्रीरोगांमध्ये गर्भाशय काढून टाकले जाते. या अवस्थेतदेखील पाळी येत नाही. जननेंद्रियांना प्रसूतीमध्ये किंवा एखाद्या शस्त्रक्रियेम ध्ये जंतुसंसर्ग झाल्यावर योनिमार्गाला सूज येते व योनिमार्ग बंद होतो. अशा वेळी रक्तस्राव न होता गर्भाशयात व बीजनलिकेत साठून राहतो. परिणामत: मासिक पाळी येत नाही. अतिव्यायाम, दीर्घकाळ रक्ताची कमतरता (anaemia), अति उपवास करण्याने अतिकृश असल्याने किंवा अतिलठ्ठपणाने देखील पाळी येत नाही.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) च्या वतीने नगर शहरात २१ सप्टेंबर रोजी 'युथॉन ३.०' चे आयोजन

## देशभरातील दिग्गज करणार अनुभवी मार्गदर्शन

नगर – जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो अहिल्यानगर) व जितो युथ विंगच्या वतीने नगरमध्ये २१ सप्टेंबर रोजी युथॉन ३.० चे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील दिग्गज व अनुभवी मार्गदर्शक यात विविध विषयांवर प्रत्यक्ष मार्गदर्शन करणार आहेत. अरणगाव रोडवरील सॉलिटिअर – बडीसाजन येथे सकाळी ७ ते सायंकाळी ७ यावेळेत सदर कार्यक्रम होणार आहे. नवीन विचार, नवीन संधी, नवीन संकल्पनांची सविस्तर माहिती घेऊन नव्या पिढीला आपल्या करिअरच्या दृष्टीने योग्य पाऊल उचलण्यासाठी सदर कार्यक्रम उपयुक्त ठरेल, अशी माहिती जितो अहिल्यानगरचे चेअरमन आलोक मुनोत व सेक्रेटरी तुषार कर्णावट यांनी दिली.

युथ विंगचे चेअरमन चेतन भंडारी व सेक्रेटरी यश भंडारी यांनी सांगितले की, युथॉनमध्ये बुल बिअर अँण्ड बियाँड या विषयावर वक्ते अनिल सिंघवी संवाद साधणार आहेत. अनिल सिंघवी हे सी.ए. असून झी बिझनेसचे मॅनेजिंग एडिटर आहेत. कॉर्पोरेट क्षेत्रात त्यांचा ३० वर्षांचा अनुभव आहे. देशातील एक अभ्यासू व अनुभवी कॉर्पोरेट तज्ज्ञ म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७ वाजता नगरमध्ये प्रथमच नवीन पद्धतीने गीत संगीतमय कॉफी वेव पार्टीने होणार आहे. यात सगळे जण धमाल मस्ती करून मुख्य कार्यक्रमात सहभागी होतील. यानंतर मेडिटेशन होईल. सकाळी नाष्टा, दुपारी जेवण तसेच सायंकाळी हाय टीची सर्वांसाठी उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रतिक चोप्रा हे ए.आय. फॉर स्मार्टर बिझनेस या आधुनिक विषयावर मार्गदर्शन करतील. चोप्रा हे १७ वर्षांपासून अत्याधुनिक टेक्नॉलॉजी प्रॉडक्ट तयाथ करण्यात अग्रेसर आहेत. सिलिकॉन व्हॅली येथे सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून त्यांनी काम केले आहे. नवीन एआय तंत्रज्ञानाचा त्याचा अभ्यास आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून आपण आपल्या व्यवसायाला नव्या उंचीवर कसे नेऊ शकतो यावर ते भाष्य करतील

अमित जैन हे योग्य गुंतवणुकीचे तंत्र मंत्र अवगत करतील. जैन हे अशिका ग्लोबल फॅमिली ऑफिसचे सहसंस्थापक आहेत. भारतीय अर्थव्यवस्था व गुंतवणूक या विषयांत त्यांचा अभ्यास व हातखंडा आहे. बदलत्या युगात कोणत्या क्षेत्रात गुंतवणूक करावी, जागतिक बाजारपेठेतील घडामोडी, त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम आणि आपल्याला उपलब्ध संधी या विषयावर ते मार्गदर्शन करतील.

जयप्रकाश गुप्ता याचे दि फ्युचर ऑफ वेल्थ या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. जयप्रकाश गुप्ता हे धन ग्रुपचे संस्थापक आहेत. त्यांना अनेक वर्षांचा मार्केटचा अभ्यास व अनुभल आहे. सी सी एन बी सी आवाज सह अन्य मिडिया हाऊसमध्ये ते तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून सहभागी होत असतात. मार्केट मधील नवनवीन संधी आणि भविष्य याचा त्यांना अभ्यास आहे.

राहुल कपूर हे अनस्टॉपेबल माईंड सेट विषयावर मार्गदर्शन करून मनाची ताकद वाढविण्यासाठी काय केले पाहिजे याचा उहापोह करणार आहेत. राहुल कपूर हे मोटिव्हेशनल स्पीकर असून देश विदेशात त्यांचे कार्यक्रम होत असतात. मनःक्तीचा सुयोग्य वापर, सकारात्मक मानसिकता, संघ भावना वृद्धिंगत करणे, टिम स्पिरीट अशा विविध विषयांवर ते सहजसोप्या पद्धतीनं मार्गदर्शन करतील.

कार्यक्रमाची सांगता निशांत सुरी यांच्या स्टॅण्ड अप कॉमेडी या लाईव्ह कार्यक्रमाने होईल. निशांत सुरी हे स्टॅण्ड अप कॉमेडीयन असून देशाच्या विविध भागात त्यांना लाईव्ह कार्यक्रमासाठी निमंत्रित केले जाते. अमेझॉन प्राईम व्हिडिओच्या एका सीझनचे ते विजेते आहेत. युथॉन कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून नाव नोंदणी अत्यावश्यक आहे. अधिक माहितीसाठी संपर्क – ८६९८६५२७२७.



ज्येष्ठ सेवेकरी रामचंद्र डोंगरे कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# ज्येष्ठ सेवेकरी रामचंद्र डोंगरे कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित

नगर – जय भवानी शंकर मठाचे ज्येष्ठ सेवेकरी रामचंद्र नामदेव डोंगरे (मामा) यांना राज्यस्तरीय कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार टाकळीभान (ता. श्रीरामपूर) येथील ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. यावेळी गुरुवर्य शंकरचरण, केडगाव मठाधिपती अशोक महाराज आदींच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाला सागर जाधव, सुरज वाघ, ओंकार रासकर, जयदिप होले, आकाश करवे, सिद्धेश पलंगे, गणेश कुंभार, प्रथमेश कुंभार, अनुज कुंभार, अविष्कार हिरवे, विनय बायस, नंदकुमार बायस, प्रकाश कुंभार, दिपक लोखंडे, राजु सस्ते, सागर घोलप यांसारखे सेवेकरी उपस्थित होते.

रामचंद्र डोंगरे (मामा) यांनी दौंड येथील सद्गुरु शंकर शेठ भवानी मठाच्या माध्यमातून धार्मिक कार्य करत आहे. त्यांनी विविध धार्मिक कार्यक्रम, भक्तांसाठी सेवा तसेच समाजहिताचे उपक्रम राबवून समाजामध्ये सकारात्मक वातावरण निर्माण केले आहे.

अहिल्यानगर परिसरातही त्यांचा धार्मिक सेवेसोबतच सामाजिक कार्यात सहभाग असतो. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय कार्यगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.



आय एम एस संस्थेच्या एमबीए विभागातील प्रा. सय्यद मुदस्सर नजीर यांना शिक्षक दिनाच्या औचित्याने 'आदर्श शिक्षक पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना आय एम एस तर्फे संचालक डॉ. एम. बी. मेहता आदी.

# आयएमएसचे प्रा. सय्यद मुदस्सर यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार'

नगर – आय एम एस संस्थेच्या एमबीए विभागातील प्रा. सय्यद मुदस्सर नजीर यांना शिक्षक दिनाच्या औचित्याने 'आदर्श शिक्षक पुरस्कार' जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार युथ आयकॉन फेडरेशन व समीर शेख मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ६ सप्टेंबर रोजी प्रदान करण्यात आला.

शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्ण व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या निवडक शिक्षक–प्राध्यापकांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा उपक्रम राबविण्यात आला होता.

या निमित्ताने आय एम एस तर्फे संचालक डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस तसेच मॅनेजमेंट विभागप्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे यांच्या उपस्थितीत प्रा. सय्यद यांचा गौरव करण्यात आला.

# स्पर्धा घेणे म्हणजे सुप्त कालागुणांना वाव देणे

## नगरसेवक मनोज दुलम यांचे प्रतिपादन; श्रीनिवास बोज्ञा मित्र मंडळाचे घरगुती गणेशोत्सव स्पर्धेचे बक्षीस वितरण

नगर – सध्याच्या काळात अध्यात्मिकतेची ओढ लागण्यासाठी अशा प्रकारच्या स्पर्धा घेणे गरजेचे आहे, या स्पर्धा घेतल्यामुळे संपूर्ण कुटुंब चांगल्या कामात एकत्र होतात व त्यामुळे त्यांच्या सुप्त कालागुणांना वाव भेटतो. मंडळाने भरवलेली स्पर्धा ही कौतुकास्पद आहे, अश्याच स्पर्धा त्यांनी वेळो वेळी भरवावे व या स्पर्धेत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन नगरसेवक मनोज दुलम यांनी केले.



सावेडी उपनगरातील श्रीनिवास बोज्ञा मित्र मंडळाच्या वतीने घरगुती गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण नगरसेवक मनोज दुलम यांच्या हस्ते करण्यात आले.

सावेडी उपनगरातील श्रीनिवास बोज्ञा मित्र मंडळाच्या वतीने घरगुती गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण नगरसेवक मनोज दुलम यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सर्वकल्याण सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अशोक काळे, महिला बचत गट समितीचे अध्यक्षा सौ. विद्याताई एक्कलदेवी, माजी नगरसेविका सौ. वीणाताई बोज्ञा उपस्थित होते.

यावेळी अशोक काळे म्हणाले या स्पर्धा मुळे कुटुंबच नाही तर सर्वच नागरिकांमध्ये समन्वय घडविण्याचे काम या मंडळाने केले असून वीणा बोज्ञा या ज्या वेळेस नगरसेविका होत्या त्या वेळेस असे उपक्रम बरेच राबविलेत व या पुढेही लोकांभिमुख उपक्रम राबवावे असे आवाहन केले.

सौ. विद्याताई एक्कलदेवी यांनीही कार्यक्रमाची प्रशंसा करून स्पर्धेत भाग घेतलेल्याचे व त्यांनी केलेले सजावटीचे कौतुक केले.

या वेळी विजेते स्पर्धक प्रथम पारितोषिक सुदर्शन विठ्ठल दुर्गम यांना रोख रु. ३००१ स्मृती चिन्ह व शाल द्वितीय पारितोषिक आनंद श्रीनिवास बंग यांना रोख रु. २००१ स्मृती चिन्ह व शाल, तृतीय पारितोषिक रीमा उदय सुरम यांना रोख रु. १००१ स्मृती चिन्ह व शाल व उत्तेजनार्थ म्हणून रेखा नितीन केदारीयांना रोख रु. ७०१ स्मृती चिन्ह व शाल या प्रमाणे बक्षिसे देण्यात आले.

सुरुवातीस माताजी श्री निर्मलादेवी यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप गांगर्डे सर यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक श्रीनिवास बोज्ञा यांनी केले. तिरमलेश पासकंटी यांनी आभार मानले. या वेळी नागरिक व सहजयोगी उपस्थित होते.



चास येथील साकेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या डी. फार्मसी विभागास महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी अतिउत्तम श्रेणी प्रदान करण्यात आली.

# साकेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीला महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची अतिउत्तम श्रेणी प्रदान

नगर – चास येथील साकेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या डी. फार्मसी विभागास महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी अतिउत्तम श्रेणी प्रदान करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या देखरेख समितीने महाविद्यालयास २८ मार्च २०२५ रोजी भेट दिली व त्या अंतर्गत महाविद्यालयाचे बाह्य परीक्षण करण्यात आले. यामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यामधील अध्ययन, अध्यापन, अत्याधुनिक प्रयोगशाळा व त्यातील उपकरणे, नवीन उपक्रम, प्रशासकीय बाबी, विद्यार्थ्यांशी संवाद ही संस्था स्तरावरील शैक्षणिक कामकाजाची पाहणी करण्यात आली, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी महाविद्यालयामध्ये होणाऱ्या वेगवेगळ्या कार्यशाळा गुणवंत विद्यार्थी विद्यार्थ्यांच्या विविध कंपनीमध्ये झालेली निवड विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाबरोबरच असणारे टेक्निकल स्किल्स या सर्व बाबींचे समितीने कौतुक केले. प्राचार्य डॉ. संदेश वायाळ यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांनी माहिती समितीस सादर केली त्यानुसार ३० ऑगस्ट रोजी साकेश्वर कॉलेज ऑफ डी. फार्मसी या महाविद्यालयास अतिउत्तम श्रेणी प्राप्त झाली.

याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध आडसूळ, सचिव डॉ. लीना आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, संचालक कृष्णा आडसूळ, संस्थेच्या सदस्य कल्पना आडसूळ आणि रत्ना आडसूळ, टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप एम. पाटील, नॉन टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य व डायरेक्टर डॉ. संभाजी पठारे, प्राचार्य डॉ. धनंजय लांडगे, डॉ. प्रदीप पंडित व प्रा. रमेश गडाख यांनी आनंद व समाधान व्यक्त केले.

या यशामध्ये महाविद्यालयाचे विभागप्रमुख प्रा. सोनाली बरके, शैक्षणिक समन्वयक प्रा. प्रीती पोटे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचा सहभाग असल्याचे डॉ. संदेश वायाळ यांनी सांगितले.

# डॉ. ना. ज. पाऊलबुद्धे आयुर्वेद महाविद्यालय, नगरला राष्ट्रीय आयोग, आयुष मंत्रालय, भारत सरकारची मान्यता

नगर – सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. ना. ज. पाऊलबुद्धे आयुर्वेद महाविद्यालय, नारायणडोहो, सोलापूर रोड, अहिल्यानगर यांना नुकतीच भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग, आयुष मंत्रालय, भारत सरकार (NCISM), नवी दिल्ली यांची अधिकृत मान्यता प्राप्त झाली आहे. या मान्यतेमुळे आयुर्वेदाच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शहरातच उच्च शिक्षणाची नवी संधी उपलब्ध झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा करून घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाने केले.

अहिल्यानगर शहर शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने प्रगती करत असून, या मान्यतेमुळे वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रातही शहराचा लौकिक वाढला आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना 'डॉ. ना. ज. पाऊलबुद्धे शैक्षणिक संकुला'च्या माध्यमातून विविध क्षेत्रांत शिक्षणाची दारे उघडण्यात आली आहेत. अभियांत्रिकी, फार्मसी, तसेच इतर विविध व्यवस्थापन अशा शाखांनंतर आता वैद्यकीय शिक्षणाची ही भर पडल्याने हे संकुल बहुआयामी शैक्षणिक केंद्र म्हणून अधिक सक्षम झाले आहे.

मान्यतेनंतर महाविद्यालयाकडून अत्याधुनिक हॉस्पिटल, प्रयोगशाळा, ग्रंथालय, अनुभवी प्राध्यापकवर्ग तसेच संशोधनाला चालना देणारी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिकच नव्हे तर प्रात्यक्षिक ज्ञान आणि संशोधन क्षेत्रातही प्रगती करण्याची मोठी संधी मिळणार आहे.

याशिवाय महाविद्यालयाच्या माध्यमातून आरोग्य शिबिरे, ग्रामीण भागातील सेवा प्रकल्प आणि आयुर्वेदाचा प्रसार करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा संकल्प संस्थेकडून करण्यात आला आहे.

# राष्ट्रसंत जनार्दन स्वामी डी. फार्मसी महाविद्यालयास महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळांकडून व्हेरी गुड श्रेणी प्राप्त

नगर – राष्ट्रसंत जनार्दन स्वामी शिक्षण संस्था संचलित राष्ट्रसंत जनार्दन स्वामी डी. फार्मसी महाविद्यालयास महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांच्याकडून नुकतीच व्हेरी गुड श्रेणी प्राप्त झाली आहे

दरवर्षी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ संलग्नित महाविद्यालयाचे परीक्षण करते. या परीक्षणामध्ये महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता तपासण्यात येते, त्याचबरोबर महाविद्यालयाची इमारत, प्रयोगशाळा, वर्ग खोल्या, ग्रंथालय, संगणक कक्ष या सर्व घटकांची पडताळणी होते. महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होतोच त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना ही वाव मिळतो. राष्ट्रसंत जनार्दन स्वामी डी. फार्मसी महाविद्यालयामध्ये पालक सभा, शैक्षणिक सहल, औद्योगिक भेट, पोस्टर सादरीकरण, वृक्षारोपण, अनाथ आश्रम भेट या सर्व बाबींवर लक्ष दिले जाते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन जैन व उपप्राचार्य डॉ. उषा जैन नेहमी कार्यरत असतात. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या खेळाकडे सुद्धा लक्ष दिले जाते व विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन जैन यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ.नितीन जैन, उपप्राचार्य डॉ. उषा जैन, डी फार्मसी विभागप्रमुख सौ.स्मिता शेटे (लव्हुरीकर), प्रा. भारती कुचे, प्रा. सोनाली राठोड, प्रा. श्वेता काळे, प्रा.वैष्णवी लोखंडे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी नेहमी कार्यरत असतात.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल राष्ट्रसंत जनार्दन स्वामी फाउंडेशनचे अध्यक्ष चांगदेव कातकडे, सचिव प्रसाद कातकडे, उद्योजक विजय कडू, इंजिनिअर दिपक कोटमे, संचालक प्रणित कातकडे यांनी अभिनंदन केले.

# महाराष्ट्र ज्योतिष मंडळाच्यावतीने अहिल्यानगरचे डॉ. उदय अश्रित यांना 'होरा भुषण' सन्मान प्राप्त



नगर – पुण्याच्या ज्योतिष शास्त्राचा अभ्यास व प्रसार करणाऱ्या बृहन महाराष्ट्र ज्योतिष मंडळाच्या वतीने फलज्योतिष व भविष्य कथन विषयात उल्लेखनीय कार्या बद्दल अहिल्यानगर चे ज्योतिषाचार्य डॉ. उदय अश्रित यांचा 'होरा भुषण' प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

या सन्मानाबद्दल त्यांचे ज्योतिष मंडळाचे कुलगुरू आनंदकुमार कुलकर्णी, कुलपती नंदकिशोर जकातदार, कुलसचिव मालती शर्मा, पुणे केंद्र प्रमुख नयना जकातदार आदींनी अभिनंदन केले आहे.

# प्राचार्यांनी जेन झी पिढीपुढे मोकळेपणाने उभे राहून आपली बाजू मांडवी

## पुणे विद्यापीठाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांचे आवाहन, प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांना आदर्श प्राचार्य पुरस्कार प्रदान

नगर – नगर जिल्ह्याने देशाचे राज्याचे नेतृत्व केले आहे. अशा जिल्ह्याकडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला अपेक्षा आहेत. सध्याच्या आव्हानांच्या व आवाहनांच्या काळात निर्माण झालेली दरी दूर करण्यासाठी प्राचार्यांकडून गुणवत्तापूर्ण कामातून काहीतरी चांगले जन्मेल असा दुर्दम्य आशावाद आहे. पुरस्कार दिलेले प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांचे कार्य असेच असल्यानेच त्यांना गौरवले आहे. मागचा वैभवशाली व आजचा इतिहास पुन्हा जोडण्यासाठी माणसाने माणूस होऊन माणसाचे गाणे गायला पाहिजे. पेमराज सारडा महाविद्यायाने दिलेला आदर्श प्राचार्य पुरस्कार हा प्राचार्या मधल्या प्रशासक असलेच्या आणि प्रशासक मधल्या माणूस असलेल्या माणसाचे गाणे गाणाऱ्या माळेतील आहे. पूर्ण जगात बदल घडवनाऱ्या जेन झी पिढीचा तळ सापडत नाहीये; त्यांच्या अंतकरणात प्रवेश करण्यासाठी उत्तम काम करणाऱ्या आदर्श प्राचार्यांचीच गरज आहे. यासाठी प्राचार्यांनी या जेन झी पिढीपुढे मोकळेपणाने उभे राहून आपली बाजू मांडवी, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी केले.



पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने देण्यात येणारा 'स्व. प्राचार्य एस.एम. कुलकर्णी' आदर्श प्राचार्य पुरस्कार हडपसर येथील प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांना देताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई.

पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्राचार्यांना देण्यात येणाऱ्या 'स्व. प्राचार्य एस.एम. कुलकर्णी' आदर्श प्राचार्य पुरस्कार पुण्याच्या हडपसर येथील प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यंच्या हस्ते देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष हिंद सेवा कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर, परिक्षण समिती सदस्य व पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य सागर वैद्य, न्यू आर्टस् कॉमर्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ.पारस कोठारी, प्रशासकीय अधिकारी सुमतीलाल कोठारी, संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, जगदीश झालानी, प्रचार्य डॉ.माहेश्वरी गावित, मधुसूदन मुळे, उषा घोरपडे आदींसह प्राध्यापक व नागरिक उपस्थित होते.

सिनेट सदस्य सागर वैद्य म्हणाले, या काळात असेही प्राध्यापक आहेत ज्यांनी वीस वीस वर्ष आपल्या नोटस् ही बदलल्या नाहीत, संस्था चालकांच्या पुढे पुढे करायचे असे प्राध्यापक आहेत. पण आता गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे दिवस आले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणात जो शिक्षक व ज्या संस्था नवे बदल आत्मसात करून स्वतःमध्ये काळानुरूप बदल घडवतील तेच टिकतील. संस्थेने कृतिशील शिक्षकांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. डॉ. नितीन घोरपडे यांच्या सारखे अनेक प्राचार्य हे कृतीशील आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल. पुरस्कारांसाठी आलेल्या प्रास्तावातील सर्वच प्राचार्यांचे काम चांगले होते.

डॉ.रमेश झरकर म्हणाले, आदर्श प्राचार्य पुरस्कासाठी योग्य व्यक्तीची निवड करण्यात आली आहे. समाजाचे व विद्यार्थ्यांचे प्रश्न समजून घेत जो सोडवण्यासाठी सेवा देतो तोच प्राचार्य लोकप्रिय होतो. अशांच्या आदर्शवत प्राचार्यांच्या कार्याची शिदोरी इतरांनी घ्यावी.

प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी दिलेला आदर्श प्राचार्य पुरस्कार हा अधिक प्रेरणा व उर्जा देणारा असल्याचे सांगून सारडा महाविद्यालयाचे आभार मानले. परिक्षण समितीचे सदस्य प्राचार्य बाळासाहेब सागडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी प्रास्ताविकात पुरस्कारा मागची भूमिका व्यक्त करून स्वागत केले. प्रा.माधुरी दीक्षित यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.संगीता शेळके यांनी आभार मानले.

यावेळी सारडा महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिलिंद देशपांडे, प्रबंधक अशोक असेरी, माजी प्राचार्य डॉ.राजेंद्र शिंदे, प्रा.गिरीश कुलकर्णी, उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक डॉ.सुजित कुमावत, डॉ.राजू रिक्कल व प्रा.महेश कुलकर्णी आदींसह प्राध्यापक उपस्थित होते.

# फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत १६ वर्ष वयोगटात सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट संघाचा विजय

## मुलींमध्ये आठरे पाटील स्कूल व १२ वर्ष वयोगटात द आयकॉन स्कूलने प्रतिस्पर्धी संघाचा उडवला धुव्वा

नगर – फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत १० सप्टेंबर रोजी १७ वर्षा आतील मुलींमध्ये आठरे पाटील स्कूलने तब्बल १५ गोल व १२ वर्ष वयोगटात (मुले) द आयकॉन स्कूलने १० गोल करुन प्रतिस्पर्धी संघाचा धुव्वा उडवीत विजय संपादन केले. तर १२ वर्ष वयोगटात (मुले) आर्मी पब्लिक स्कूल, आठरे पाटील स्कूल, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट, १७ वर्षा आतील मुलींमध्ये श्री साई आणि १६ वर्ष वयोगटात (मुले) सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट संघाने विजय संपादन केले. आठरे पाटील स्कूलची खेळाडू वेदिका ससे हिने ७ गोल करुन आपल्या उत्कृष्ट खेळाची छाप पाडली.



सकाळच्या सत्रात १२ वर्ष वयोगटात (मुले) आर्मी पब्लिक स्कूल विरुध्द तक्षिला स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने ३–० गोलने विजय मिळवला. यामध्ये हर्ष नेहारकर याने २ व राज राऊत याने १ गोल केला.

आठरे पाटील स्कूल विरुध्द ज्ञानसंपदा यांच्यात सामना रंगला होता. आठरे पाटीलकडून वेदांत ससे याने गोलची डबल हॅट्रीक केली. तर भावेश नेरे याने १ गोल केला. ज्ञानसंपदा कडून सत्या चौधरी याने १ गोल करुन खाते उघडले होते. मात्र त्यापुढे संघाला गोल करता आला नाही. ७–१ गोलने आठरे पाटील स्कूलचा संघ विजयी ठरला.

१७ वर्षाआतील मुलींमध्ये आठरे पाटील स्कूल विरुध्द डॉन बॉस्को यांच्यात झालेल्या सामन्यात आठरे पाटील स्कूलच्या मुलींनी आक्रमक खेळी करुन उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. चक्क एकामागोमाग तब्बल १५ गोल करुन प्रतिस्पर्धी संघाचा धुव्वा उडवला. या सामन्यात डॉन बॉस्कोला एकही गोल करता आला नाही. १५–० गोलने आठरे पाटील स्कूलचा संघ विजयी ठरला. यामध्ये वेदिका ससे हिने ७ गोल केले. इरम कुद्दुस, स्वरांजली शेळके, निलम पवार यांनी प्रत्येकी २ गोल केले. अफिया सय्यद व अक्षरा कराळे यांनी प्रत्येकी १ गोल केला. दुपारच्या सत्रात १६ वर्ष वयोगटात (मुले) सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट विरुध्द डॉन बॉस्को यांच्यात झालेल्या सामन्यात सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंटच्या संघाने ५–० गोलने विजय मिळवला. या सामन्यात आक्रमक खेळी करुन जोएल साठे याने २ व आर्यन आठवल, आयुष धापटकर व माहीर गुंदेचा याने उत्कृष्ट खेळ करुन प्रत्येकी १ गोल केला.

१२ वर्ष वयोगटात (मुले) ऑक्झिलियम कॉन्व्हेंट विरुध्द ऊर्जा गुरुकुल यांच्यात झालेल्या सामन्यात ऑक्झिलियम कॉन्व्हेंटकडून वेदांत बांगर व आशिष आढाव यांनी प्रत्येकी १ गोल करुन संघाला २–० ने विजय मिळवून दिला.

आयकॉन स्कूल विरुध्द श्री साई संघात झालेल्या सामन्यात द आयकॉन स्कूलने १० गोल करुन एकहाती विजय संपादन केले. द आयकॉनच्या उत्कृष्ट खेळापुढे श्री साईला एकही गोल करता आला नाही. १०–० गोलने द आयकॉन स्कूलचा संघ विजयी झाला. यामध्ये आयकॉनकडून पर्व लोढा याने ४ गोल केले. देवर्श पत्की याने २ व युग कांकरिया, विहान कासकर, अरहान सय्यद, लोकेश मुनोत यांनी प्रत्येकी १ गोल केला.

१७ वर्षा आतील मुलींमध्ये द आयकॉन विरुध्द श्री साई यांच्यात झालेल्या सामन्यात ०–२ गोलने श्री साई संघाने विजय मिळवला. यामध्ये ह्वया तडके व स्वामिनी जाधव यांनी प्रत्येकी १ गोल केला.

# १३ सप्टेंबर रोजी गोल्डन रेट्रो मेलोडीज एव्हरग्रीन हिट्स लाईव्ह म्युझिकल ऑर्केस्ट्रासोबत जुन्या गीतांची मैफल



नगर – अहिल्यानगर शहरात संगीतप्रेमीं साठी आनंदाची पर्वणी ठरणारा गोल्डन रेट्रो मेलोडीज एव्हरग्रीन हिट्स हा लाईव्ह म्युझिकल ऑर्केस्ट्रा सोबत जुन्या गीतांची मैफल आयोजित करण्यात आली आहे. ९०'ज टॉकीज क्लबच्या वतीने हा कार्यक्रम १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ ते रात्री ९.३० वाजेपर्यंत माऊली संकुल, सावेडीरोड, अहमदनगर येथे होणार आहे. अशी माहिती डॉ. दमण काशीद यांनी दिली.

७०–८० च्या दशकातील जुन्या हिंदी चित्रपट संगीताची मोहिनी पुन्हा अनुभवायला मिळणार आहे.

कार्यक्रमाचे संकल्पना व दिग्दर्शन डॉ. दमण काशीद (पाटील) व प्रशांत बंडगर यांनी केले असून प्रमुख गायक म्हणून डॉ. दमण काशीद आणि डॉ. गायत्री कुलकर्णी त्यांच्यासोबत गायक कलाकार म्हणून विद्या तन्वर, डॉ. सत्तार सय्यद, डॉ. मनोज घुगे, प्रशांत बंडगर, संजय माळवदे, राजेंद्र शहाणे, श्रीपाद शहाणे, रोनित सुखधन, कु. आराधना गायकवाड, सुनीता धर्माधिकारी आदींचा सहभाग राहणार आहे.

यासाठी तब्बल २० वादक कलाकार सहभागी होत असून श्रीकांत गडकरी (ऑक्टापॅड/रिदम मशीन), सनी गायकवाड (ढोलक), अमित सालवे (कॉंगो/ढोलक), अभिजीत शर्मा (ड्रमसेट), सिद्धार्थ थट्टे (तबला), नितीन शिंदे (ट्रिपलॅड/डफ), सुधीर सोनवणे (फ्लूट), संकेत देहडे (लीड गिटार), प्रकाश लगड (बेस गिटार), महेश गुरव (सॅक्सोफोन), दिलावर शेख (सिंथेसायझर), राजेश देहडे (कीबोर्ड) नरेन साळवे, गिटार टीम प्रियंका पवार, आदिती राऊत, ग्रेसी डायमरी, मृणाल पालवे, शर्वरी मरकड, ट्रंपेट विलास गुरव, कोरस राजू कुलकर्णी, सुनील चांदणे, रोज जगताप, अश्विनी वैद्य, पर्कशनिस्ट विनोद पंडित, साऊंड सिस्टिम हरमन ऑडिओ ब्रिजेश बजाज, लाईट सिस्टम हरमन लाईट्स जीतु बजाज, अशा अनेक कलाकारांच्या वादनाने कार्यक्रम रंगणार आहे.

सूत्रसंचालन डॉ. दिनेश पाटोळे, डॉ. सचिन काकडे आणि डॉ.अविनाश वारे करतील.

कार्यक्रमाचे व्यवस्थापन ॲड. चंदनशिव, महेश घावटे, सुशिल देठे, सचिन परदेशी, अजित रोकडे, महानुर सर, डॉ. विवेकानंद कंगे यांनी केले आहे. रसिकांसाठी प्रवेश मोफत ठेवण्यात आला आहे (पास आवश्यक) त्यासाठी ज्ञानेश्वर माने व महेश घावटे यांच्याशी ७३५०८८१५१५ / ८९५६३६३६६८ या नंबर वर संपर्क करावे.

कार्यक्रमाला उपस्थित राहून सुरांच्या या जादुई सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशांत बंडगर यांनी केले आहे.

# अहमदनगर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात पोएटिक फार्मसीचे उद्घाटन

नगर – बी.पी.एच.ई. सोसायटीचे अहमदनगर महाविद्यालय व इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पोएटिक फार्मसी या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे उद्घाटन नुकतेच महाविद्यालयात करण्यात आले. या सोहळ्यास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नोएल पारगे, उपप्राचार्य डॉ. प्रितमकुमार बेदरकर, डॉ. भालसिंग, नॉन–ग्रँट समन्वयक डॉ. सय्यद रझाक शर तसेच रजिस्ट्रार सौ. कल्पलता भिंगारदिवे उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. पारगे यांनी पोएटिक फार्मसीच्या पाटीवरील क्लोज्ड वरून ओपन अशी खूण वळवून फार्मसी सुरू असल्याची घोषणा केली. यानंतर फित कापून औपचारिक उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागातील एस.वाय.बी.ए.ची विद्यार्थिनी जान्हवी संधाना हिने केले.

या कार्यक्रमात मान्यवरांचा 'फॅकल्टी सर्वायव्हल किट' देऊन सन्मान करण्यात आला. या किटमध्ये रोजच्या छोट्या गरजांसाठी लागणाऱ्या टी बॅग्स, बिस्किटे, वह्या, पेन, चॉकलेट्स, बुकमार्क्स इत्यादी वस्तू होत्या. विशेष म्हणजे या सर्व वस्तूंना औषधांसारखी विनोदी नावे देण्यात आली होती. उदा. चोको ड्रिल म्हणजे मूड सुधारण्यासाठीचे चॉकलेट. या अभिनव कल्पनेने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

### पोएटिक फार्मसी म्हणजे नेमके काय?

ही फार्मसी औषधे न देता कविता औषध म्हणून देते. विद्यार्थ्यांसाठी एकूण २२ तर शिक्षकांसाठी १० असे वेगवेगळे आजार या फार्मसीत नोंदवले आहेत. हे आजार चार गटात विभागले गेले – माइंड ॲण्ड मूड डिसऑर्डर्स, स्टुडंट लाईफ सिंड्रोम्स, लो मूड डिसऑर्डर्स आणि रिअल इश्यूज. या आजारांना विनोदी नावे देण्यात आली आहेत, जसे की सेल्फ–डाऊट सिंड्रोम, फेल्युअर फ्लू, लेक्चर कोमा (लेक्चरला जाण्याची इच्छा नसणे), डेडलाईन पॅनिक, एक्झाम–आयटी (परीक्षेपूर्वीची चिंताग्रस्त अवस्था), मॉम्स फूड विथड्रॉल (हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना घरच्या जेवणाची ओढ). शिक्षकांसाठी सिलॅबस ओव्हरलोडायटिस, मल्टिटास्क बर्नआऊट, लेट सबमिशन फ्लू अशी नावे देण्यात आली आहेत.



अहमदनगर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात पोएटिक फार्मसीचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रत्येक आजारासाठी इंग्रजी विभागाने एक कविता प्रिस्क्रिप्शन म्हणून नेमली असून, फार्मसीत आलेल्या विद्यार्थ्यांना या कविता औषधाच्या चिठ्ठीसारख्या देण्यात आल्या. अशा रीतीने विद्यार्थ्यांना फक्त वाचनाचा आनंदच नव्हे, तर त्याचा जीवनाशी संबंध जोडण्याचा नवा अनुभव मिळाला. या उपक्रमाचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थी समोर येऊन कवितेचे पाठांतर व आस्वाद घेणे शिकावे, टीकात्मक विचारशक्ती विकसित करावी, जीवनातील समस्यांशी साहित्य जोडता यावे, आत्मविश्वास वाढवावा, आणि सर्जनशीलतेतून मानसिक आरोग्य व भावनिक स्थैर्य मिळवावे हे आहे.

विभागप्रमुख डॉ. आशिता बंडेलू यांनी आपल्या भाषणात इंग्रजी विभागाच्या सर्जनशील उपक्रमांबद्दल सांगताना, आगामी काळात अशा उपक्रमांचा विस्तार महाविद्यालयाबाहेर, समाजापर्यंत करण्याचा मानस असल्याचे नमूद केले. प्राचार्य डॉ. पारगे यांनीही विभागाच्या या कल्पकतेचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हा उपक्रम पूर्णपणे डीएससी इंग्रजी प्रमुख विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी साकारला. अप्रिशिएटिंग पोएट्री या अभ्यासक्रमा अंतर्गत त्यांनी काव्यपठणाचा अनुभव घेत विद्यार्थ्यांना कवितेत रस निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या प्रकल्पात सक्रीय भूमिका घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मुक्तियार हक (एम.ए. II), नगोरी रोशिदुल (एम.ए. II), रुकैया मर्चंट (टी.वाय.बी.ए.), भूमिका घावरी (टी.वाय.बी.ए.), अर्बीना शेख (एस.वाय.बी.ए.), अंजली जांगिड (एस.वाय.बी.ए.), अनुश्का सेवानी (एस.वाय.बी.ए.), जान्हवी संथाना (एस.वाय.बी.ए.), अनस पठाण (एस.वाय.बी.ए.), आदित्य क्षीरसागर (एस.वाय.बी.ए.), कुणाल झा (एफ.वाय.बी.ए.), साहिल शेलार (एफ.वाय.बी.ए.), प्रीती अरोळे (एफ.वाय.बी.ए.), प्रज्ञा शिंदे (एफ.वाय.बी.ए.), व फातिमा कागजी (एफ.वाय.बी.ए.) यांचा समावेश होता.

पोएटिक फार्मसी ही मूळ संकल्पना डॉ. निमिषा बंडेलू यांची असून, अध्यापक तेजल सोनवाने यांनी विविध आजारांना दिलेल्या कवितांच्या औषधी नावांची कल्पना साकारली. हा प्रकल्प डॉ. आशिता बंडेलू (विभागप्रमुख) व डॉ. कमलाकर भट यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. तसेच डॉ. अशोक बोरुडे, डॉ. पराग आठवले, अध्यापक गौरव मिसाळ व अध्यापक गायत्री नायर या प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

इंग्रजी विभागात यापूर्वीही अनेक उपक्रम राबविण्यात आले आहेत. बुक ब्रू हाउस हा पुस्तक वाचन व चर्चेसाठीचा क्लब २०२४ मध्ये डॉ. कमलाकर भट यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यापक तेजल सोनवाने यांनी सुरू केला असून आजही नियमितपणे हा उपक्रम राबविला जातो. याशिवाय विभागाने चित्रपटप्रदर्शनानंतर होणाऱ्या चर्चासत्रांचे आयोजन, पहिल्यांदाच आयोजित केलेला खजिना शोध (Treasure Hunt) व अन्य सर्जनशील कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडले आहेत. विभागात नुकतेच स्पोकन इंग्लिश कोर्स देखील सुरू करण्यात आला आहे, ज्याचे मार्गदर्शन अध्यापक गौरव मिसाळ करीत आहेत. या सर्व उपक्रमांद्वारे इंग्रजी विभाग विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला बळकटी देत आहे व भविष्यात अशा अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला आहे.



### जागतिक साक्षरता दिनानिमित्त नालेगावमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप

जागतिक साक्षरता दिनानिमित्त नालेगाव येथे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. भाजपाचे माजी चिटणीस सुनिल सकट यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी कु. आरती सुनिल सकट व नंदाताई दातरंगे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नुकतेच पितृछत्र हरपलेल्या कु. सोनाक्षी नांगरे व कु. देवेश नांगरे या दोन्ही विद्यार्थ्यांना शिक्षणात अडथळा येऊ नये म्हणून शैक्षणिक साहित्य भेट म्हणून देण्यात आले.

# शासकीय सेवेतील अभियंत्यांची सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात

नगर – शासकीय सेवेतील अभियंत्यांची सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर या संस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच माऊली संकुल येथे संस्थेचे मुख्य प्रवर्तक व आजीव अध्यक्ष इंजि. रो.मा. लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात झाली. या सभेला मुख्य अभियंता इंजि. हनुमंत धुमाळ, सेवानिवृत्त मुख्य अभियंता इंजि. एम.के. पोकळे, सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता इंजि. एम.पी. खाडे, इंजि. बी.एन. बहिर, कार्यकारी अभियंता इंजि. बी.एन.खर्डे, इंजि. पी.एन. थोरात, इंजि. व्ही.टी.शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. सभासदांचीही उपस्थिती लाभली.



शासकीय सेवेतील अभियंत्यांची सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मुख्य प्रवर्तक व आजीव अध्यक्ष इंजी.रो.मा.लांडगे यांचा अमृत महोत्सव पूर्तीनिमित्त संस्थेच्या वतीने मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सर्व संचालक, सदस्य आदी (छाया–विजय मते)

सभेत गुणवंत पाल्यांचा तसेच सेवानिवृत्त व पदोन्नती प्राप्त सभासदांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जलसंपदा विभागातील निवृत्त सचिव व संस्थेचे मुख्य प्रवर्तक आजीव अध्यक्ष इंजि. रो.मा. लांडगे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त संस्थेच्या वतीने मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

सभेच्या प्रारंभी संस्थेचे चेअरमन इंजि. प्रल्हाद पाठक यांनी प्रास्ताविक करून वार्षिक कामकाजाचा अहवाल सादर केला. त्यांनी लांडगे साहेबांच्या आदर्श कार्यपद्धतीमुळे संस्थेने सातत्याने केलेली प्रगती अधोरेखित केली. तसेच संस्थेचे माजी आदर्श चेअरमन व विद्यमान तज्ञ संचालक इंजि. रविंद्र देशमुख यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख करून सर्वच सेवानिवृत्त सभासदांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

या वार्षिक सभेत विषयपत्रिकेतील सर्व विषयांवर चर्चा होऊन त्यांना एकमुखी मान्यता देण्यात आली. सभासदांच्या प्रश्नांना चेअरमन इंजि.प्रल्हाद पाठक व व्यवस्थापक व्ही.एस.रक्ताटे यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

यावेळी मार्गदर्शनपर भाषणात इंजि. रो.मा. लांडगे यांनी संस्थेच्या पारदर्शक, सभासदाभिमुख कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले व भविष्यातही संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

व्हा. चेअरमन इंजि. अभिजित देशमुख यांनी आभार मानले. सूत्रसंचालन संचालक इंजि. दादाभाऊ करंजुले यांनी केले.

# विनयभंगाच्या खटल्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता

नगर – महिलेशी विनयभंग (भा.दं.वि. ३५४) केल्याच्या खटल्यात आरोपीस न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले. १० सप्टेंबर रोजी हा निकाल देण्यात आला आहे. सदर प्रकरणानुसार, १० डिसेंबर २०१४ रोजी फिर्यादी महिला आरोपीच्या घरी मुलीच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाला आली होती. त्यानंतर आरोपीने फिर्यादीला तिच्या मैत्रिणीच्या घरी सोडतो, असे सांगून अरणगाव वाळकी रोडला त्याच्या कारने घेऊन गेला. तर आरोपीने फिर्यादीला गाडीतच ओढणी ओढून, लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करुन तिचा विनयभंग केला, असा आरोप फिर्यादीने केला होता. या तक्रारीवरून कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला होता.

तपास पूर्ण करून पोलीसांनी आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्यात सरकारी पक्षाने पाच साक्षीदार उभे केले. मात्र साक्षीदारांच्या जबाबात गंभीर विसंगती आढळल्या. आरोपीच्या वतीने ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी प्रभावी उलटतपासणी करून बचाव मांडला. त्यांचे युक्तिवाद व साक्षीदारांच्या जबाबातील विसंगती यामुळे न्यायालयाने आरोपीविरुद्धचे सर्व पुरावे अपुरे असल्याचे नमूद केले.सरकारी पक्ष आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याने न्यायालयाने आरोपीस सर्वच पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले. आरोपीच्या बाजूने ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. गणेश शेटे यांनी सहकार्य केले.

# आरोग्यमंत्र्यांसह झालेल्या बैठकीनंतर एनएचएम कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे

## १० मागण्यांना तत्वतः मान्यता; एकत्रीकरण समितीच्या लढ्याला यश



मुंबई – राष्ट्रीय आरोग्य अभियानातील (एनएचएम) कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या समवेत झालेल्या बैठकीनंतर अखेर मागे घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार याविषयी सकारात्मक असल्याचे सांगत आबिटकर यांनी संघटनेतील पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन १३ पैकी १० मागण्यांना तत्वतः मान्यता दिली. तसे लेखी पत्र राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीच्या पदाधिकाऱ्यांना सुपूर्त केले. यामुळे गेल्या २३ दिवसांपासून सुरू असलेला बेमुदत संप अखेर मागे घेण्याचा निर्णय संघटनेने घेतला.

१४ मार्च २०२४ रोजी झालेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी व्हावी, यासाठी १९ ऑगस्टपासून एनएचएमच्या राज्यभरातील सुमारे ३५ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद आंदोलन सुरू होते. विविध मागण्यांसाठी आरोग्य सेवेतील १६ संघटनांनी प्रथमच एकत्रित येऊन यात सहभाग घेतला होता. मंत्री आबिटकर यांनी आज एकत्रीकरण संघटनेशी चर्चा करून यावर तोडगा काढला. यावेळी संघटनेचे राज्य समन्वयक विजय गायकवाड, दिलीप उटाणेड, भाग्यश्री रंगारी, डॉ. दत्ता गायकवाड, डॉ. राम नागे, हर्षल रणवरे, डॉ. प्रकाश मोरे, स्वप्नील गोसावी, श्रीधर पंडित, गौरव जोशी, बबलु पठाण यांच्यासह इतर राज्य समन्वयक उपस्थित होते. तत्पूर्वी आयुक्त कादंबरी बलकवडे आणि सार्वजनिक आरोग्य सेवेचे संचालक नितीन अंबाडेकर यांच्यातही याविषयी सकारात्मक बैठक झाली.

आबिटकर म्हणाले की, समायोजन प्रक्रियेसह कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने मार्गी लागावे, अशी माझी कायमच आग्रही भूमिका होती. परंतु, हे प्रश्न सोडवताना भविष्यात त्यामध्ये कोणत्याही त्रुटी राहू नये, यासाठी मी प्रयत्नशील होतो. सामान्य प्रशासक, ग्रामविकास, नगर विकास, वैद्यकीय शिक्षण यांच्या देखील मी सातत्याने संपर्कात होतो. सदर कार्यभार सांभाळणाऱ्या मंत्री महोदयांनी तसेच वरिष्ठांनी याविषयी अनुकूलता दर्शविली. मागण्यांची अंमलबजावणी करताना शासकीय पातळीवर सकारात्मकता असली तरी प्रशासकीय आणि तांत्रिक बाबींची पडताळणी आणि पूर्तता करण्यासाठी आवश्यक तो वेळ द्यावा लागेल, असेही त्यांनी आवर्जुन सांगितले. उर्वरित ३ मागण्या समायोजनासंदर्भात असल्याने त्यातील तांत्रिक बाबींना लागणारा विलंब लक्षात घेता, त्यावरही लवकरच कार्यवाही केली जाईल, असे सांगून मंत्री आबिटकर यांनी संघटनेला आश्वासित केले. तसेच पुढील समन्वय व पाठपुराव्यासाठी संघटनेस समिती स्थापन करावी, अशी सूचनाही केली.

संघटनेचे समन्वयक गायकवाड यांनी सांगितले की, मंत्री महोदयांशी झालेल्या आश्वासक चर्चेनंतर आम्ही त्याक्षणी संप मागे घेण्याचा निर्णय घेतला. समायोजनाबाबत पहिल्या टप्प्यात १० वर्षाहून अधिक सेवा पूर्ण झालेल्या १३ हजार कर्मचाऱ्यांना फायदा होणार असून भविष्यात सर्व राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ होईल. काही मागण्या टप्प्याटप्प्याने मार्गी लागतील, याची आम्हाला कल्पना असून यासाठी शासन व प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करण्याची आमची भूमिका आहे. आम्ही लवकरच मंत्री महोदयांच्या सूचनेचे पालन करून समिती स्थापन करणार आहोत. यासाठी आम्हाला वेळ दिल्याबद्दल मी सर्व संघटनेच्या वतीने आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आयुक्त कादंबरी बलकवडे आणि संचालक नितीन अंबाडेकर यांचे मनापासून आभार मानतो.

तत्वतः मंजूर झालेल्या मागण्या; १. कर्मचारी मूल्यांकन अहवालानुसार, मानधनवाढ न करता सरसकट दरवर्षी ८ टक्के व एकवेळची बाब म्हणून सन २०२५ व २६ मध्ये १० टक्के वार्षिक वाढ करावी., २. ३ व ५ वर्षे सेवा पूर्ण झालेले अधिकारी व कर्मचारी यांना लॉयटी बोनस पूर्ववत लागू करावा., ३. Pay Protection नियमानुसार मानधन संरक्षित करावे जुन्या कर्मचाऱ्यांची नवीन ठिकाणी नियुक्ती झाल्यास लागू करावे., ४. सन २०१६ आणि २०१७ पूर्वी कार्यरत असलेल्या व २०१७ च्या नंतर नियुक्त झालेल्या कर्मचारी यांच्यातील मानधनातील तफावत दूर करून नवीन वेतन सुसूत्रीकरण धोरण राबवावे., ५. कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण अपघाती मृत्यू पाच लक्ष अपंगत्व २५ लाख औषध उपचार २ ते ५ लाख प्रमाणे लागू करावे., ६. ईपीएफ, ग्रॅज्युटी योजना १५ हजार त्यापेक्षा जास्त मानधन असणाऱ्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना लागू करावी., ७. १० वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे १०० टक्के समायोजन व प्रत्येक वर्षी ३० टक्के प्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभाग ग्रामविकास व नगर विकास विभाग वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग यामध्ये समायोजन करावे., ८. १४ मार्च २०२४ रोजी झालेल्या शासन निर्णयानुसार जोपर्यंत शासन स्तरावर पात्र कर्मचारी यांचे समायोजन होत नाही तोपर्यंत सर्व नियमित शासकीय कर्मचारी यांचे नियम व वेतन आयोगाच्या वेळोवेळी होणाऱ्या शिफारशीनुसार लागू करावे किंवा समान काम समान वेतन लागू करावे ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे रिक्त जागी समायोजन होणार नाही अशा सर्व कंत्राटी व अधिकारी कर्मचाऱ्यांचे अधिसंख्य पदे निर्माण करून समावेशन करावे., ९. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या सेवा कालावधी सहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर कंत्राटी सेवा नियमित करण्याचा निर्णय सर्वांना लागू करणे., १०. कर्मचारी मूल्यांकन अहवाल असमाधानकारक असल्यास नैसर्गिक न्यायाच्या नियमानुसार सदर करणाऱ्या कर्मचाऱ्यास स्वतःची बाजू मांडण्याची संधी उपलब्ध करून देणेबाबत परिपत्रक जारी करणे., ११. समुदाय आरोग्य अधिकारी बदली धोरणाप्रमाणे जिल्हा व अंतर जिल्हा बदली एक वेळची बाब म्हणून सर्व एनएचएम कर्मचारी यांना विनंतीप्रमाणे बदली धोरण लागू करावे., १२. CHO यांचे एकत्रित मानधन ३५ हजार व पीबीआय रुपये ५००० करावे., १३. अतिदुर्गम भागात काम करणाऱ्या कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना हँडशिप अलाउन्स वनक्षलग्रस्त भागाप्रमाणे सर्व भत्ते देणे.

# नंदीवाले-तिरमली समाजाच्या आरक्षणासाठी अहिल्यानगर शहरात १८ सप्टेंबर रोजी मोर्चा

## शासनाचे लक्ष वेधण्यासाठी समाजबांधव एकवटणार

नगर - नंदीवाले आणि तिरमली समाजाला सातारा गॅझेटनुसार अनुसूचित जाती-जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा, या प्रमुख मागणीसाठी १८ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर शहरात मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. याच्या नियोजनासाठी नुकतीच शासकीय विश्रामगृह येथे बैठक पार पडली. या बैठकीस छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे अध्यक्षस्थानी होते. बैठकीत ठरविण्यात आले की, नंदीवाले आणि तिरमली हे समाज प्रत्यक्षात एकच असून, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे.



नंदीवाले आणि तिरमली समाजाला सातारा गॅझेटनुसार अनुसूचित जाती-जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा, या प्रमुख मागणीसाठी मोर्चाच्या नियोजनासाठी शासकीय विश्रामगृह येथे बैठक पार पडली, याप्रसंगी सहभागी झालेले संघटनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी.

मोर्चाचे नियोजन नंदीवाले-तिरमली समाजाचे सुभाष काकडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील तसेच शहरातील समाजबांधवांनी मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन छावा संघटनेचे प्रदेश कार्यध्यक्ष रावसाहेब काळे आणि विनोद साळवे यांनी केले आहे.

रावसाहेब काळे म्हणाले की, नंदीवाले आणि तिरमली समाजाला सातारा गॅझेटनुसार आरक्षणाचा लाभ तातडीने देणे आवश्यक आहे. शासन दरबारी अनेक वेळा मागण्या केल्या तरीही याबाबत ठोस निर्णय घेतला गेला नाही. त्यामुळे समाजातील तरुणाई आणि पुढील पिढीच्या भविष्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने लढा उभारणे गरजेचे आहे. १८ सप्टेंबरचा मोर्चा हा केवळ हक्कासाठीचा संघर्ष असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस समाजातील आणि संघटनेतील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. यामध्ये बाबुराव फुलमाळी, बाबू काकडे, सुरेश काकडे, गुलाब काकडे, उत्तम फुलमाळी, संजय फुलमाळी, भीमा औटी, राजू आव्हाड, श्रीधर शेलार, विलास काकडे यांचा समावेश होता.

# प्रवासी महिलेच्या बॅगेतून २ लाखांच्या रोकडची चोरी

## तारकपूर बसस्थानकातील घटना, चोरट्यावर गुन्हा दाखल

नगर - नगरहून उल्हासनगरला जाण्यासाठी तारकपूर बसस्थानकात बस मध्ये बसत असताना झालेल्या गर्दीत प्रवासी महिलेच्या बॅगेतून २ लाखांची रोकड अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शारदा दामू उबाळे (वय ५५, रा. सुभाष टेकडी चाळ, उल्हासनगर, ठाणे) यांनी १० सप्टेंबरला सायंकाळी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची शेतजमीन पाथर्डी तालुक्यातील मोहोजदेवढे येथे होती. ती त्यांनी त्यांच्या ओळखीचे आप्पा गोयकर यांना विकलेली आहे. या जमीन विक्रीतील राहिलेले २ लाख रुपये नेण्यासाठी फिर्यादी व त्यांचे पती हे २ सप्टेंबर रोजी मोहोजदेवढे येथे गेले. तेथे त्यांनी आप्पा गोयकर यांच्या कडून २ लाख रुपये घेतले आणि ते त्यांच्या बहिणीकडे बालमटाकळी (ता.शेवगाव) येथे गेले. तेथून ४ सप्टेंबर रोजी पुन्हा उल्हासनगर येथे जाण्यासाठी दोघे नगर च्या तारकपूर बसस्थानकात गेले.

दुपारी १२ च्या सुमारास नगर - कल्याण बस लागल्याने त्या बसमध्ये फिर्यादी व त्यांचे पती दोघे बसण्यासाठी गेले. त्यावेळी तेथे प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती. या गर्दीतून वाट काढत ते बस मध्ये जावून बसले, थोड्यावेळाने तिकीट काढण्यासाठी बॅगेतून पैसे काढण्यास गेले असता त्यांना बॅगेतील २ लाख रुपयांची रोकड आढळून आली नाही. त्यामुळे त्यांना धक्का बसला, त्यांनी बस मध्ये शोधाशोध केली मात्र पैसे सापडले नाहीत. त्यानंतर त्यांनी उल्हासनगर येथे जावून १० सप्टेंबर रोजी पुन्हा फिर्यादी देण्यासाठी नगराला येत तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. ४ सप्टेंबर रोजी दुपारी तारकपूर बसस्थानकात बस मध्ये बसत असताना झालेल्या गर्दीत आपल्या बॅगेतून २ लाखांची रोकड अज्ञात चोरट्याने चोरून नेली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी चोरट्याविरुध्द बीएनएसकलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# सरकारने सकारात्मक धोरण जाहीर करून शिक्षकांना न्याय द्यावा : बाबासाहेब बोडखे

नगर - सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी पिटीशन क्रमांक १३८५/२०२५ मध्ये दिलेल्या निवाड्यानुसार इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत शिकवणाऱ्या शिक्षकांना (५३ वर्षांवरील शिक्षक वगळता) दोन वर्षांच्या आत शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण करणे अनिवार्य केले आहे. या निर्णयामुळे संपूर्ण शिक्षक वर्गामध्ये नाराजी, असंतोष व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. या अन्यायकारक निर्णयाविरोधात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने सर्वप्रथम आवाज उठविला असून, राज्य सरकारने याबाबत सकारात्मक व शिक्षक हिताचे धोरण स्वीकारावे, अशी मागणी करण्यात आली आहे. शिक्षक परिषदेच्या वतीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना निवेदन देण्यात आले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांची भेट घेण्यात आली. या भेटीत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे शिक्षकांवर होणारा अन्याय, त्यांच्यामध्ये निर्माण झालेला असंतोष याची माहिती मुख्यमंत्र्यांना देण्यात आली. राज्य सरकारने शिक्षक हितासाठी ठोस व तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी शिष्टमंडळाने केली.

यासंदर्भात शालेय शिक्षण मंत्री यांनाही स्वतंत्र निवेदन पाठविण्यात आले आहे. तसेच १५ सप्टेंबर रोजी राज्यभरातील शिक्षक परिषदेचे विभागीय व जिल्हा पदाधिकारी शिक्षणाधिकारी कार्यालयात निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा देणार आहेत.

याप्रसंगी शिक्षक परिषदेचे प्रांताध्यक्ष वेनुनाथ कडू, प्रांत कार्यालयीन मंत्री निरंजन गिरी, कोकण विभागाध्यक्ष गुलाबराव पाटील, मुंबई विभागाध्यक्ष सुहास हिर्लेकर, उपाध्यक्ष बबनराव कातकडे, ठाणे जिल्हा पदाधिकारी निलेश खाडे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आम्ही सर्व आदर करतो, मात्र हा निर्णय सर्वांसाठी लागू करणे अन्यायकारक होईल. शिक्षक हे समाज घडवित आहेत, राष्ट्राच्या भविष्यास दिशा देण्याचे काम करतात. त्यांच्यावर अशा प्रकारची सक्ती करणे म्हणजे त्यांच्या सन्मानावर आघात करणे होय. पूर्वीच्या शिक्षकांनी सर्व अटी, शर्ती व शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरीला लागले आहेत. टीईटीचा नवीन नियम त्यांना लागू केल्यास त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागणार आहे. राज्य सरकारने सकारात्मक धोरण जाहीर करून शिक्षकांना न्याय द्यावा, असे बाबासाहेब बोडखे म्हणाले.



नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या पालकांचे स्वागत करण्यासाठी आयोजित केल्या गेलेल्या 'मॅनेजमेंट टीचर्स पॅरेंट्स स्टुडन्ट कन्व्हेंशन' या कार्यक्रमाचे औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

# श्री छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत व वृक्षारोपण

नगर - नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या पालकांचे स्वागत करण्यासाठी आयोजित केल्या गेलेल्या 'मॅनेजमेंट टीचर्स पॅरेंट्स स्टुडन्ट कन्व्हेंशन' या कार्यक्रमाचे औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे यांनी आपल्या भाषणामधून विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी आणि त्यांचे भविष्य घडविण्यासाठी संस्था अविरत कार्य करत राहील, अशी ग्वाही दिली. संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांनी विद्यार्थ्यांना सध्या परिस्थितीमध्ये वाढत असणारी शिक्षणाची गती आणि शिक्षण घेत असताना कोणत्या आवश्यक गोष्टी विद्यार्थ्यांनी आत्मसात करायला पाहिजे, याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त जी.डी. खानदेशे, सिताराम खिलारी, जयंतराव वाघ आदी उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय.आर.खर्डे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत महाविद्यालयामध्ये मागील वर्षी अमलात आणल्या गेलेले विविध उपक्रम आणि यावर्षी राबविल्या जाणाऱ्या नववनीन संकल्पना याविषयी सविस्तर माहिती दिली.

उपस्थित पालकांमधून प्रीतम मुथा, प्रशांत पाटील व मुरलीधर कराळे यांनी देखील आपल्या भाषणांमधून प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेश प्रक्रमाकांची पसंती या महाविद्यालयाला दिल्याची माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अक्षय देखणे व प्रा. वर्षा येवले यांनी प्रथम वर्ष समन्वयक डॉ. एम. के. भोसले यांनी नवीन अभ्यासक्रमाविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख कार्यक्रमाप्रसंगी डॉ. एम. के. भोसले (प्रथम वर्ष समन्वयक), प्रा. एस. एम. वाळके (ई ॲन्ड टी सी विभाग प्रमुख), प्रा. पी. जी. निकम (सिव्हील विभागप्रमुख), प्रा. ए. बी. काळे (मेकॅनिकल विभागप्रमुख), प्रा. एस. पी. विधाते (कम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख), डॉ. व्ही. व्ही. पाटील (ए.आय. विभागप्रमुख), प्रा. बी. एन. खरड (रोबोटिक्स ॲंड ऑटोमेशन विभाग प्रमुख, प्रा. पी. आर. मुटकुळे (ए आय एम एल विभागप्रमुख) यांच्यासमवेत विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे कार्यक्रम झाल्यानंतर वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेण्यात आला व पालकांच्या हस्ते वृक्षारोपण महाविद्यालयाचे परिसरात करण्यात आले.

# नगर, जामखेड, शेवगावात अवैध धंद्यांवर छापे; एकाच दिवसांत ३८ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर - नगर शहर परिसरात एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत, शेवगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत, जामखेड तालुक्यातील खर्डा पोलिस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या वेगवेगळ्या पथकांनी १० सप्टेंबर रोजी एकाच दिवसात तिरट, बिंगो जुगार तसेच दारु विक्रेत्यांवर छापेमारी करत ४३ आरोपींना पकडले आहे. त्यांच्या कडून ३८ लाख २० हजार ८२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी पोलिस उपनिरीक्षक समीर अभंग, पोलीस अंमलदार बिरप्पा करमल, शामसुंदर गुजर, मोहन साखरे, अमोल आजबे, प्रकाश मांडगे यांचे पथक खर्डा पोलीस ठाणे हद्दीत तर पोलीस अंमलदार राहुल द्वारके, रिचर्ड गायकवाड, सोमनाथ झांबरे, बाळासाहेब नागरगोजे, महादेव भांड, भाग्यश्री भिटे यांचे पथक तयार करुन ते अहिल्यानगर शहरामध्ये व शेवगांव पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध धंद्यांवर कारवाई साठी पाठविले होते.



शहर व शेवगांव पोलीस ठाणे हद्दीमध्ये कारवाईसाठी नेमलेल्या पथकाने एमआयडीसी परिसरात बिंगो जुगार अड्डा चालक अभिषेक बाळासाहेब खाडे (वय २५, रा. लोहगाव, ता. नेवासा) यास ताब्यात घेवुन त्याचेकडुन जुगार साहित्य, रोख रक्कम असा २३ हजार २७० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला व त्याच्या वर गुन्हा दाखल केला. शेवगांवच्या ढोरजळगाव येथे विनापरवाना दारु विक्री करणाऱ्या देविदास झुंबर मुसळे याला पकडुन त्याच्या ताब्यातून ४९ हजार ७९५ रुपये किमतीची देशी, विदेशी दारु जप्त केली. तसेच उषाताई बाळासाहेब मुसळे (रा. ढोरजळगाव) हिच्या ताब्यातून १४ हजार १६० रुपये किमतीची देशी विदेशी दारु जप्त केली

## खर्डा हद्दीत मोठा जुगार अड्डा उध्वस्त, ४० जुगारी पकडले

जामखेड तालुक्यातील खर्डा पोलिस ठाण्याच्या हद्दीत जातेगांव शिवारातील जातेगांव रोड, निपाणी फाटयाजवळ सुरु असलेल्या मोठा जुगार अड्डा या पथकाने उध्वस्त केला. या ठिकाणी ५ डाव सुरु होते. त्यात ४० जुगारी हे तिरट जुगार खेळत होते. या सर्वांना पकडून त्यांच्या कडून रोख रक्कम, तिरट जुगार खेळण्यासाठी लागणारे साहित्य, वाहने, मोबाईल असा एकुण ३७ लाख ३३ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन त्यांचेविरुद्ध खर्डा पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सारसनगरमधून चोरीला गेलेले दागिने फिर्यादींना केले सुपूर्त

नगर - सारसनगर परिसरात झालेल्या दोन चोऱ्यांचा तपास लावत आरोपींना पकडून त्यांच्या कडून हस्तगत केलेले दागिने भिंगार कॅम्प पोलिसांनी पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते फिर्यादींना सुपूर्त केले आहेत. चोरीस गेलेले आपले दागिने पुन्हा मिळाल्याने फिर्यादींच्या चेहऱ्यावर हसू फुलले होते. फिर्यादी अंजली संतोष अडिवळे (रा. येवलेनगर, सारसनगर) यांच्या राहत्या घराचे कुलूप चोरट्यांनी डुब्लीकेट चावीने उघडून सोन्याचे दागिने चोरी केले होते. हा प्रकार १३ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता ते २५ मार्च २०२५ रोजी रात्री ८ च्या सुमारास घडला होता. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता. भिंगार कॅम्प पोलिसांनी गुन्ह्याचा तपास करत संबंधित ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपींना पकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेले २ लाख ६१ हजार ९९० रुपये किमतीचे ८३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले होते. त्याचबरोबर याच परिसरात केवळकुमार भगवानदास गांधी (रा. सारसनगर) यांच्या घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने चोरट्यांनी लांबविले होते. हा प्रकार ३ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.१५ ते ७.१५ या कालावधीत घडला होता. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याच्या तपासात आरोपीकडून ८ लाख ४० हजार रुपये किमतीची १२० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड हस्तगत करण्यात आली होती.





भिंगार कॅम्प पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्यातील हस्तगत केलेले दागिने फिर्यादींना सुपूर्त करताना पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे. समवेत स.पो.नि. जगदीश मुलगिर व पथक.

या दोन्ही गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत झाल्यानंतर न्यायालयीन कार्यवाही पूर्ण करत तो मुद्देमाल १० सप्टेंबर रोजी संबंधित फिर्यादींना पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आला. भिंगार कॅम्प पोलिस ठाण्याचे स.पो.नि. जगदीश मुलगिर, पोलिस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, पोलिस अंमलदार संदीप घोडके, दीपक शिंदे, रवि टकले, रेखा पुंड, प्रमोद लहारे, विठ्ठल राठोड यांनी ही कारवाई केली.

# 'वास्तुशास्त्र अभ्यासक्रमा'चा १३ सप्टेंबरला नगरच्या आय.एस.डी.टी.मध्ये होणार प्रारंभ

## नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती



नगर - आय.एस.डी.टी. या संस्थेत १३ सप्टेंबर रोजी दु.३ वा. येथील वास्तुशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा शुभारंभ अहिल्यानगरचे पुत्र आणि नांदेडचे विद्यमान जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष विनायक देशमुख यांनी दिली.

संचालिका पुजा देशमुख यांनी सांगितले, संस्थेमध्ये सध्या इंटेरियर डिझाईन, टेक्सटाईल डिझाईन, फॅशन डिझाईन यांचे अभ्यासक्रम चालविले जातात. संस्थेमार्फत आता वास्तुशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. वास्तुशास्त्र हा आता एक आवश्यक घटक बनला असून मग ते जुने राहते घर असो किंवा नवीन घराची खरेदी असो किंवा व्यवसायाची जागा असो, अशा प्रत्येक ठिकाणी वास्तुशास्त्राचा विचार केला जातो. त्या दृष्टीने इंटेरियर डिझायनर, आर्किटेक्ट या सर्वांसाठीच या अभ्यासक्रमाचा उपयोग होणार आहे. प्राचार्य अरुण गावडे यांनी सांगितले, दोन महिने कालावधीच्या या अभ्यासक्रमाचे वर्ग आठवड्यातील दोन दिवस आयोजित केले जाणार आहेत. इंटेरियर डिझायनर, इंजिनियर्स, आर्किटेक्ट, गृहिणी, वास्तुशास्त्र विषयात करिअर करु इच्छिणारे हौशी अभ्यासक यांच्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरणार आहे. दोन महिने कालावधीचा हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी स्वतःचा वास्तुशास्त्र सल्लागार हा जोड व्यवसाय सुरू करू शकतील आणि स्वतःचे अतिरिक्त उत्पन्न मिळू शकतील, असा विश्वास प्राचार्य गावडे यांनी व्यक्त केला.

या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुकांनी आय.एस.डी.टी. निर्मल चेंबर्स मागे, होमी केअर लॅब समोर, लालटाकी, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.


# जाहीर नोटीस

प्रति,

१. **मा. धर्मादाय उपआयुक्त,** अ.नगर कार्यालय मुख्य प्रशासकीय इमारत २ रा मजला, सावेडी, अ.नगर

२. **मा. निरिक्षक श्री. दिलीप शेनफडू खलाल-कोळी**, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अ.नगर

**संदर्भ :-**

१. तिळवण तेली समाज ट्रस्ट अ ४६३ अहमदनगर यांचे समोरील चौकशीअर्ज ५६२/२०२४ (म.सा.वि.व्य. अधिनियम १९५० चे कलम ४१अ प्रमाणे) दि. ११.०६.२०२५ रोजीचा आदेश मा. धर्मादाय उपायुक्त, अहिल्यानगर न.वा. जगताप साहेब..

२. तिळवण तेली समाज ट्रस्ट अ.नगर अ ४६३ या न्यासाची चौकशी अर्ज नं. ५६२/२०२४ निवडणुक २०२५ ते २०२८ या सालाकरीता मा. धर्मादाय उपआयुक्त, अहिल्यानगर यांचे निरिक्षक श्री. दिलीप शेनफडू खलाल-कोळी यांचे पत्र दिनांक २०.०८.२०२५ जा.क्र. २६९२/२०२५ याबाबत.

३. तिळवण तेली समाज ट्रस्ट अ.नगर अ ४६३ चे न्यासाचे विश्वस्त श्री. हरीभाऊ बाबुराव डोळसे व श्री. प्रसाद अर्जुन शिंदे यांना निरिक्षक धर्मादाय उपायुक्त, अहमदनगर यांनी दिनांक २०.०८.२०२५ या पत्रानुसार दिनांक १२.०७.२०२५ रोजी विश्वस्त श्री. हरीभाऊ बाबुराव डोळसे यांनी नवा मराठा या वृत्तपत्रात जाहीर प्रकटन केले. दि. २१.०८.२०२५ रोजी समाज बांधवांची सभा बोलावून ठराव ३ विषय ३ वर निवडणुक अधिकारी धर्मदाय आयुक्ताचे आदेशाप्रमाणे ॲड. ए. एस. काळे यांची निवडणुक अधिकारी म्हणुन सन २०२५ ते २०२८ या सालाकरीता नेमणूक केलेबाबत.

**महोदय,**

संदर्भ क्र. १ ते ३ या पत्रानुसार तिळवण तेली समाज ट्रस्ट अ ४६३ यांचे सभासद व विश्वस्त श्री. हरीभाऊ बाबुराव डोळसे व श्री. प्रसाद अर्जुन शिंदे यांचेकडील सभासद यादी व ठराव प्रत दि.२५/०९/२०२५ (१५ दिवसांचे आत) हरीभाऊ बाबराव डोळसे व श्री. प्रसाद अर्जुन शिंदे यांचेकडील सभासद यादी व ठराव प्रत आपले कार्यालयात हजर करण्याबाबत व निवडणुक अधिकारी यांचेकडे खालील पत्त्यावर कागदपत्र हजर करणेबाबत असे पत्र संबंधितांना देण्यात यावे. त्याप्रमाणे सन २०२५ ते २०२८ निवडणुक प्रक्रिया सुरु करण्यापुर्वी समाज बांधव सदर ट्रस्टचे सभासद यादी जाहीर करता येईल, असे आपणास कार्यालयीन निरिक्षक म्हणुन संबंधितांना कळविण्यात यावे, ही विनंती.

दिनांक १०.०९.२०२५
अ.नगर

शिक्का

**ॲड ए.एस. काळे**
निवडणूक अधिकारी
अ- ४६३, अ.नगर म्युनि. हाऊस नं. २३९२,
श्री. विठ्ठल रुख्मिणी मंदिर दाळमंडई, अहमदनगर
मो.नं. ९४०४१०६६३२



## सहकार महर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अ.नगर

# २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

**सहकारमहर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अहिल्यानगर. या संस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक २७/०९/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वा., सिताबन लॉन, कोठी रोड, अ.नगर येथे संस्थेचे विद्यमान चेअरमन मा. श्री. समीरजी अरुणजी बोरा यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांच्या कामकाजाकरिता आयोजित केली आहे. तरी सदर सभेस पतसंस्थेचे सभासदांनी सहभागी व्हावे ही विनंती.**

**❋ सभेपुढील विषय ❋**

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २९/०९/२०२४ रोजी झाली त्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे (उक्त सभेचा वृत्तांत पतसंस्थेचे कार्यालयामध्ये पहावयास मिळेल.)
२. मा.संचालक मंडळाने सादर केलेला दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल व वैधानिक लेखापरिक्षक यांनी तपासून प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रक व वैधानिक लेखापरिक्षण अहवालास मंजुरी देणे.
३. मा.संचालक मंडळाने सुचवलेल्या सन २०२४ - २०२५ चे नफा वाटणीस व लाभांश यांस मंजुरी देणे.
४. सन २०२५-२०२६ या सहकारी वित्तीय वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणुकीस मान्यता देणे.
५. सन २०२४-२०२५ चे दोष दुरुस्ती अहवालातील नोंद घेऊन स्विकृती देणे.
६. सन २०२४-२०२५ चे मंजुर अंदाजपत्रकापेक्षा कमी / जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे व सन २०२४-२०२५ सालासाठी सादर केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
७. महाराष्ट्र शासनाच्या सामोपचार परतफेड योजने अंतर्गत सवलत दिलेल्या थकीत कर्ज खात्याची माहिती घेणे व संचालक मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे.
८. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थांना सुधारीत आदेश उपविधी लागू करण्याबाबत आलेल्या परिपत्रकाची माहिती घेऊन मंजुरी घेणे.
९. गैरहजर सभासदांच्या अनुपस्थितीस परवानगी देणे.
१०. मा.चेअरमन यांचे मान्यतेने आयत्यावेळी येणारे विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे.

स्थळ : अहिल्यानगर
दिनांक - १०-०९-२०२५

मा. व्यवस्थापक समितीचे अनुज्ञेने
प्रशांत चंपालाल भंडारी
सर व्यवस्थापक

**विशेष सूचना -**

१. गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास सदर वार्षिक सभा त्याच दिवशी वरील ठिकाणी सायं. ६.०० वा. घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्या नसली तरी वरील विषयांचा विचार होईल.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस आपल्या संस्थेच्या मुख्य कार्यालयात नोटीस बोर्डवर लावली आहे.
३. ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल सालातील संस्थेच्या कामकाजाबाबत प्रश्न विचारायचे असतील त्यांनी ते प्रश्न दि. १८/०९/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत संस्थेच्या मुख्यालयात अथवा शाखामध्ये लेखी कळवावेत.
४. सभासद सहकारी शिक्षण व प्रशिक्षण, कार्यक्रम वार्षिक सभेच्या वेळेपुर्वी अर्धा तास आधी घेण्यात येईल. तरी सभासदांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे हि विनंती.

